शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(खाजगी वितरण)

अंक ऑक्टोबर २०२०

अंक क्र. ४४

Website : www.bhidekul.in

Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 13 कोल्हापूर ता. 17 ऑक्टोबर 2020 किंमत 2 रुपये Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## साभार कृतज्ञता



श्री. विद्याधर शंकर भिडे, रा. डोंबिवली ह्यांनी नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला रु. ५,००,००० (पाच लाख रुपये) देणगी नुकतीच प्रदान केली. श्री. विद्याधर भिडे यांचे मूळ गाव माभळे गोसावी उपशाखा क्र. ६ मधील ११ व्या पिढीतील आहेत. ह्यांचा जन्म ठाणे येथे १९४७ मध्ये झाला. ह्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. असून सुरुवातीला व्यवसाय करीत होते. त्यानंतर खाजगी कंपनीमधून १९९८ पर्यंत नोकरी केली. परंतु त्या सुमारास त्यांच्या अर्धांगिनी सौ. शोभा ह्यांच्या आजारपणामुळे त्यांनी निवृत्ती स्वीकारली. २००९ मध्ये त्यांच्या पत्नीचे निधन झाले. सध्या डोंबिवलीमध्ये स्थायिक असून घरापासून जवळच असलेल्या मयुरेश्वर मंदिरात श्रीगजाननाच्या सेवेमध्ये व्यस्त असतात. श्रीदुर्गामाता व श्रीगजानन ही त्यांची श्रद्धास्थाने आहेत. विशेष म्हणजे आजपावेतो त्यांनी भिडे प्रतिष्ठानच्या कोणत्याच कार्यक्रमास उपस्थिती दाखवली नाही, तरीपण भिडे प्रतिष्ठानचा पारदर्शी व्यवहार व भिडे ज्ञातीसाठी प्रतिष्ठानचे कार्य तसेच निस्वार्थीपणे कार्य करणारे विश्वस्त व पदाधिकारी यांच्या कामाची पावती आहे ह्याबद्दल दुमत नसावे. श्री. विद्याधर यांनी केलेले सहकार्य व आर्थिक मदतीसाठी त्यांचे भिडे प्रतिष्ठान सदैव ऋणी आहे.

## अभिनंदन !



नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवात अथर्वशीर्ष पठण स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून सहभागी झालेल्या २५० स्पर्धकांमधून २ ते ५ ह्या वयोगटामध्ये चि. ईशान अमित भिडे, पुणे याला रु. १५१ चे रोख पारितोषिक मिळाले. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन ! रामा हिलिंग सेंटर ह्या संस्थेच्यावतीने ह्या स्पर्धा २७ ऑगस्ट रोजी ऑनलाईन घेण्यात आल्या. तसेच स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, महाल, नागपूर संचालित राज्यस्तरीय ऑनलाईन विनोदी कथाकथन स्पर्धेमध्ये 'अ' गटामध्ये सुमारे ३०० स्पर्धकांमधून अंतिम फेरीसाठी १५ स्पर्धकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये द्वितीय क्रमांकाने चि. ईशान भिडे, पुणे याची निवड करण्यात आली. भिडे प्रतिष्ठानतर्फे चि. ईशानला उज्ज्वल यशासाठी हार्दिक शुभेच्छा !



सौ. आसावरी शेट्ये-भिडे, रा. रत्नागिरी यांची अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळावर बालरंगभूमी परिषद, मुंबई प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक अभिनंदन. सौ. आसावरी ह्या बालरंगभूमीसाठी अनेक वर्षे कार्यरत आहेत. 'आम्ही भिडे' अंकासाठी सुद्धा कविता व लेख यासाठी त्यांचे योगदान आपल्याला माहिती आहेच. सौ. आसावरी यांना भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

## अभिनंदन !



केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नेमणूक मंडळाने चलनविषयक धोरण समितीमध्ये (Monitory Policy Committee) सरकार नियुक्त त्रिसदस्य म्हणून डॉ. शशांक गोपाळ भिडे, आशिमा गोयल व जयंत वर्मा यांची नियुक्ती केली. ह्या नियुक्तीचा कमाल कालमर्यादा ४ वर्षे इतकी असते. डॉ. शशांक भिडे हे मूळचे मुंडाजे, दक्षिण कर्नाटकचे असून भिडे हाऊस मुंडाजे कुटुंबापैकी एक होय. त्यांनी अमेरिकेच्या आयोवा विद्यापीठातून कृषिअर्थशास्त्रात डॉक्टरेट प्राप्त केली असून ते ८० च्या दशकामध्ये आयोवा विद्यापीठामध्ये कृषि व ग्रामीण विकास केंद्रातील अर्थशास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. डॉ. शशांक भिडे यांचेकडे शेती, व्यापक आर्थिक मॉडेलिंग, पायाभूत सुविधा आणि दारिद्र्य विश्लेषण यांसारख्या आर्थिक विषयांच्या क्षेत्रांतील संशोधनाचा अनुभव आहे. ते सध्या नॅशनल कौन्सिल फॉर ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER) ह्या वरिष्ठ संस्थेमध्ये वरिष्ठ सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. २०११ मध्ये मुंडाजे, दक्षिण कर्नाटकमध्ये झालेल्या भिडे कुल संमेलन आयोजकांपैकी हे एक सदस्य होते. विशेष म्हणजे डॉ. शीला व प्रदीप भिडे यांसारखे दिग्गज संमेलन अध्यक्ष होते. हे संमेलन म्हणजे दिग्गज भिडे एकत्र आले ही एक पर्वणीच होती. डॉ. शशांक भिडे यांची निवड भारत सरकारने केली ही भिडे कुटुंबीयांच्या दृष्टीने कौतुकास्पद बाब आहे. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान व समस्त भिडे परिवाराकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन !



स्वयंसिद्धा उमंग मंच आयोजित अक्षरधारा राज्यस्तरीय निबंध स्पर्धा नुकत्याच घेण्यात आल्या. ह्या स्पर्धेमध्ये 'आरोग्य' ह्या सौ. वृषाली मधुसुदन भिडे, माहीम, मुंबई यांच्या निबंधाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. एकूण १२० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सौ. वृषालीताईंचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून हार्दिक अभिनंदन आणि भावी यशासाठी शुभेच्छा !

### नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !

| | | |
|---|---|---|
| ऑक्टोबर | श्री. संदीप व सौ. सुकृता भिडे, अंमळनेर | २५-१०-१५ |
| | श्री. नारायण व सौ. लता भिडे, जबलपूर | २७-१०-८२ |
| नोव्हेंबर | श्री. जयराम व सौ. केतकी भिडे, सोलापूर | २५-११-८८ |
| | श्री. अमोद व सौ. धनश्री भिडे, सांगली | २७-११-१८ |
| | श्री. सिद्धार्थ व सौ. केतकी भिडे, सांगली | २८-११-१४ |
| डिसेंबर | श्री. श्रीपाद व सौ. मृण्मयी भिडे, तळेगावदाभाडे | २-१२-०१ |
| | श्री. श्रीकांत व सौ. जयश्री भिडे, | ८-१२-७४ |
| | श्री. बळवंत व सौ. संध्या भिडे, अंमळनेर | ३१-१२-८५ |

## विवाह सुवर्णोत्सव

ज्या भिडे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दांपत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दांपत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या जोडीदाराच्या साथीने व्यतीत केलेली ५० वर्षांतील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन/कविता १५० शब्दांपेक्षा शक्यतो जास्त असू नये. तसेच लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. त्याचप्रमाणे आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. असे लेख/कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रकाशित केले जातील.

✼ अधिक माहितीसाठी संपर्क :
दिलीप भिडे, पुणे. ९६५७५४१२३६ किंवा ले. क. सुनिल भिडे, पुणे मो. ९६२३०१७४४४ किंवा ई-मेलसाठी dilip.bhide15@gmail.com येथे पाठवावेत.


**आम्ही भिडे** **अंक ४४ वा**

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे
कार्यकारी संपादक : श्री. प्रदीप ज. भिडे
संपादक मंडळ : श्री. दिलीप भिडे, ले. क. सुनिल भिडे, सौ. स्नेहल भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रभाकर भिडे, श्री. राजेंद्र भिडे श्री. विनायक वि. भिडे, सौ. मेघना भिडे, सौ. प्रिती भिडे,
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, श्री. शंतनु नि. भिडे, श्री. के. मो. भिडे, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर



पत्रव्यवहारासाठी पत्ता

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४




मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१



**सहवेदना : भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.**

(१) कै. जयंत अनंत भिडे, अहमदनगर
(२) कै. मंदार रत्नाकर भिडे, डोंबिवली
(३) कै. विवेक उर्फ दत्तात्रय लक्ष्मण भिडे, सांगली

## श्रद्धांजली !



श्री. मंदार रत्नाकर भिडे, डोंबिवली यांचे दिनांक २० सप्टेंबर रोजी पनवेल येथे हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले. जानेवारी २०२० मध्ये झालेल्या पनवेल येथील भिडे संमेलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. सर्व भिडे मंडळींना एकत्र जमवून पनवेल येथे संमेलन यशस्वी करू असा दृढविश्वास त्यांनी सार्थ ठरविला. श्री. मंदार ह्यांच्या आत्मविश्वासामुळेच आपण हे संमेलन घेऊन यशस्वी केले हे वावगे ठरणार नाही. त्यांना तीन मुली असून त्या तिन्ही कन्या स्पोर्टस्‌मध्ये सुवर्णकन्या म्हणूनच ओळखल्या जातात. त्यांच्या अचानक जाण्यामुळे भिडे प्रतिष्ठानने एक तरुण कार्यक्षम कार्यकर्ता गमावला हे शल्य कायम राहील. ईश्वरी सत्तेपुढे सरते शेवटी कोणाचाच इलाज चालत नाही. ईश्वर त्यांना चिरशांती देवो ! नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान कार्यकारिणी व समस्त भिडे परिवार त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.



श्री. जयंत अनंत भिडे, अहमदनगर यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगांवमधील कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखान्याचे आसवनी विभागाचे ४५ वर्षे सरव्यवस्थापक राहून निवृत्त झाले. २००८ साली वसंतदादा साखर उद्योगातील शिखर संस्थेने सर्वोत्कृष्ट आसवनी सरव्यवस्थापक म्हणून कृषिमंत्री शरद पवार यांनी गौरविले होते. २०१४ साली डेक्कन शुगर असोसिएशनने साखर उद्योगाच्या वृद्धीसाठी महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल गुजरातच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविलेले होते. विविध साखर कारखान्यांच्या तांत्रिक सल्लागार म्हणून पण कार्य केले. मेहनती व दूरदृष्टी असलेले जयंतराव नेहमी विनम्र आणि मितभाषी व सर्वांना बरोबर घेऊन जाणारे असे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने एक अनुभवी तज्ज्ञ आज गमावला आहे. ईश्वरी सत्तेपुढे इलाज नाही. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात भिडे प्रतिष्ठान व समस्त भिडे परिवार सहभागी आहोत. ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना.

## सूचना

आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती -

**ठाणे जनता सहकारी बँक लि.,**
सदाशिव पेठ शाखा, पुणे - 30.
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018

विशेष सूचना - रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

# लेखन स्पर्धा २०२०-२१

गेली दोन वर्षे लेखन स्पर्धा घेत आहोत आणि त्याला उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. ह्या वर्षी पुन्हा आपण वेगवेगळे विषय देऊन स्पर्धा घेत आहोत. आलेल्या उत्कृष्ट लेखांना भिडे संमेलनामध्ये भरघोस पारितोषिके दिली जातील. आपला प्रतिसाद हीच 'आम्ही भिडे' अंकाची ताकद आहे. म्हणून 'लिहिते व्हा'. लेख पाठविण्यासाठी पत्ता - **दिलीप वासुदेव भिडे, सी-१०२, मेघमल्हार रागा अपार्टमेंट, एल.एम.डी. चौकाजवळ, मराठा मंदिर मागे, बावधन, पुणे-४११०२१ किंवा dilip.bhide15@gmail.com** ह्या संकेत स्थळावर सुद्धा पाठवू शकता. (शब्द मर्यादा ३०० शब्द फक्त) लेख देताना फूलस्केप कागदावर हस्ताक्षरात किंवा टाईप केलेला असावा. लिखाण मराठीतच असावे. शीर्षक आवश्यक. लेख कागदाच्या एका बाजूस लिहावा. जानेवारी २०२१ च्या अंकापासून प्रत्येक आलेल्या लेखाला प्रसिद्धी दिली जाईल. सोबत आपला एक आयकार्ड साईज फोटो देणे सुद्धा आवश्यक आहे. लेख पाठविण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२० आहे. विषय खालीलप्रमाणे -

**१) नातीगोती -** माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो जितक्या लोकांच्या संपर्कात असतो तितका तो हुरहुन्नरी राहतो. त्यामुळे माणसे जोडण्याची सवय म्हणा किंवा संपर्कात असताना तो आपलेपणाच्या सहवासात वावरत असतो. तुम्ही सुद्धा वेगवेगळ्या अनुभवांतून, प्रसंगानुसार अशी नाती जोडली असतील. अशी नाती रक्ताच्या नात्यांपेक्षा सुद्धा अधिक मायेची, आपुलकीची होतात आणि आयुष्यभर ती नाती जपण्यासाठी असलेल्या नात्याची गोष्ट लिहा. यामध्ये शक्यतो रक्ताच्या नात्यांपेक्षा अधिक वेगळे अनुभवलेले नाते अपेक्षित आहे.

**२) स्टार्टअप -** मुले, मुली, गृहिणी, तरुण छोटेखानी व्यवसाय करतात. कमी भांडवल असून सुद्धा धाडस करतात. त्यासाठी मार्केटींग करण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करून गुणवत्ता टिकवण्यासाठी हुशारीने व्यवसाय करतात. त्याकरिता भांडवलाची जमवाजमव, कच्चा माल, उद्योग सुरू करण्याची कल्पना सुचणे, तसेच त्या व्यवसायात येणाऱ्या अडचणी आणि त्यातून मार्ग काढताना आलेले चांगले-वाईट अनुभव, यश-अपयश ह्या दृष्टीने व्यवसायात बसलेला जम हे अपेक्षित आहे.

**३) माझी खादाडी -** मी एका वेळेस एका बैठकीमध्ये ५० गुलाबजाम किंवा ५० पाणीपुरी खाल्या अथवा १५ ते २० ओली भेळ, २० ते २५ केळी एका वेळी फस्त केली. काही आवडीचे खाद्यपदार्थ पैज लावून खाल्ले. असे खाण्याचे विक्रम तुम्ही केलेले असतील आणि त्यातून झालेला त्रास अथवा आनंद कसा झाला ह्याचे रंजक अनुभव पाठवा ज्यामुळे वाचकांना हे आश्चर्य वाटेल.

**४) टोपणनावांची गोष्ट -** बारशाला नामकरण होतं तरीसुद्धा बंड्या, गोट्या, बाळू, बेबी इत्यादींप्रमाणे टोपणनावांने घरात संबोधले जाते आणि आयुष्यभर मूळ नाव विसरून ह्याच नावाने हाक मारली जाते. त्यासाठी घडलेले काही प्रसंग आणि आलेले अनुभव आपल्या शब्दात लिहा.

**५) एका ट्रिपची गोष्ट -** आपल्या कुटुंबासोबत, मित्रांबरोबर किंवा नाते-वाईकांसमवेत पिकनिकला जातो. त्यावेळेस आलेल्या जवळीकीतून आपुलकी, प्रेम निर्माण होते. काहींची त्या निमित्ताने लग्नं सुद्धा ठरतात अथवा ट्रिपमध्ये अभूतपूर्व अशी घडलेली घटना, वाईट घटना आणि त्यातून आलेले चांगले-वाईट अनुभव म्हणजे आयुष्यभर शिदोरी मिळते. त्यानुरूप घडलेले प्रसंग.

**६) रि-युनियन -** लहानपणी गल्लीत, शाळेत, वाड्यात एकत्र असतो परंतु शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने तात्पुरता दुरावा येतो. आयुष्याच्या निवृत्तीच्या टप्प्यानंतर पुन्हा एकदा येतो आणि त्यावेळेस राग, लोभ, स्वार्थ न राहता असते ती फक्त निखळ मैत्री. आयुष्याच्या रामरगाड्यात असे मिळालेले दोन दिवस एक नवी ऊर्जा देऊन जाते. त्यासाठी आलेले अनुभव.

**७) दाद-फिर्याद -** आपल्या हक्कासाठी, इस्टेटीसाठी न्यायालयात अनेक वर्षे कायदेशीर लढाई करतो किंवा एखादी वस्तू, जमीन खरेदी करताना एक ग्राहक म्हणून आपल्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत किंवा फसवणूक झाली तर ग्राहक पंचायत, न्यायालयाकडे दाद मागावी लागते. त्याकरिता आपल्याला आलेले बरे-वाईट किंवा चांगले अनुभव अथवा त्यामधून आपल्याला काय शिकायला मिळाले ?

**८) भटकंती -** भटकंती करण्यासाठी काही मंडळी देश-विदेशात भेट देतात तर काही कौटुंबिक मेळावा व कार्य ह्या निमित्ताने प्रवास करतात तर काही जण कोणत्याही ट्रॅव्हल्स वा गाईडची मदत न घेता प्रवासाचे नियोजन करतात, काहींसाठी भटकंती म्हणजे विरंगुळा असतो तर काहीजण आवर्जून जिद्दीने भटकंती करतात त्यावेळेस आलेले चांगले-वाईट अनुभव.

**९) शेजारी -** माणूस समाजप्रिय आहे. आपल्या वाडीत, वस्तीत, फ्लॅट संस्कृतीमध्ये सुख-दुःखाच्या क्षणी असणारा शेजार हा रक्ताच्या नात्यापेक्षाही आपुलकीचा वाटतो. कोणत्याही क्षणी, मदतीसाठी धावणारा, जिवापाड प्रेम करणाऱ्या शेजाऱ्यांचा निःस्वार्थ, निःशब्द मैत्रीचा अनुभव.

**१०) शाळा किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेताना असलेली आठवण/आठवणी.**

## कोरोनाची करामत

एकदा काय झाले, गावात आला कोरोना
कोरोना म्हणजे काय कोणाला काही कळेना ।।ध्रु०।।
राजाने फर्मान काढले सारे काही ठप्प झाले।
नवरा-बायको, मुलेबाळे सारी माणसे बसली घरात।
काम नाही धाम नाही उमजेना झाले तळ्यात का मळ्यात
कोरोना झिंदाबाद का कोरोना मुर्दाबाद।।१।।
आम्ही पुरुष आम्ही पुरुष म्हणणारे।
झाडू घेऊन सरसावले।
केर नाही केर नाही म्हणत केर काढू लागले।
कोरोना झिंदाबाद का कोरोना मुर्दाबाद।।२।।
कोरोनामुळे सारे जग झाले उलटे-पालटे।
कुणी शिंपी झाले तर कुणी न्हावी।
कुणी लेखक तर कुणी कवी।
कोरोना झिंदाबाद का कोरोना मुर्दाबाद।।३।।
असो, झाले गेले विसरून जाऊ।
डॉक्टरां-देवांजवळ प्रार्थना करू कोरोनाला पळवून लावू।
बस झाले तुझे आता जगभर थैमान।
परत एकदा राजा काढेल एकच फर्मान।
कोरोना मुर्दाबाद का कोरोना मुर्दाबाद।।४।।

**- सौ. शिल्पा भिडे, मालाड (पू.)**

एक आठवण :

# फर्ग्युसन कॉलेजची मेन बिल्डिंग १२५ वर्षांची झाली

आनंद भालचंद्र भिडे
मो. ९४२२०१६८९६

५ मार्च १८८५ या दिवशी फर्ग्युसन महाविद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूलच्या संयुक्त इमारतीचा कोनशिला बसविण्याचा समारंभ पार पडला. या कोनशिलेवर लिहिलला मजकूर होता ...

This corner stone of the new english school and Fergusson College Building of the Deccan Education Society was laid on 5th day of March 1885 by the Society's First Patron The Right Hon. Sir James Fergusson, Bart, K.C.M.G. C.I.E. Governor of Bombay.

**पण नंतर गोष्टी अशा घडत गेल्या की या इमारतीची पुढे काहीच प्रगती झाली नाही. ही इमारत बांधलीच गेली नाही. मग या कोनशिलेचे काय झाले ? त्याचे वर्णन न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या लोकमान्य टिळक चरित्रात असे आहे - पण या बाबतीत सर्वात सांगण्यासारखी गोष्ट ही की, फर्ग्युसन कॉलेजचा हा कोणशिला समारंभ फुकट गेला, व ही कोणशिला काही वर्षांनी उचलून चतुःश्रृंगीच्या मैदानात नेऊन फिरून स्थापित करावी लागली ! पुढील थोडीशी हकीकत अलीकडे ओढून सांगावयाची तर ता. ११ जानेवारी १८९२ रोजी सायंकाळी फर्ग्युसन कॉलेजच्या पायाच्या दगडाचे स्थलांतर गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या हस्ते थाटाने करण्यात आले ! पायाच्या दगडाला सुखहि नाही दुःखहि नाही. पूर्वी त्याला समारंभाने बुधवार चौकात बसविले होते तेव्हाहि समारंभाचा थाट, व आता स्थलांतर झाले तरीहि थाट तसाच. दोनही वेळेला गव्हर्नरसाहेबांचा हात त्याला लागला. खालचे पाये वेगळे, गव्हर्नरांचे हात वेगळे, पण दगड तोच.**

एक गोष्ट मात्र खरी की बुधवार बागेत झालेल्या समारंभात सर जेम्स फर्ग्युसन यांनी एका अर्थी भाकित केले होते की एक वाढणारी शाळा आणि वाढणारे महाविद्यालय यांसाठी ही जागा अपुरी पडेल आणि त्यांची इतकी वाढ होईल की शाळा व महाविद्यालय स्वतंत्र करून महाविद्यालय मोकळ्या मोठ्या जागी हलवावे लागेल आणि मग खेळाची मैदाने, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी निवास अशा सगळ्या आवश्यक सुविधा तिथे देता येतील. प्रत्यक्षात शाळा स्थलांतरित होत होत सध्याच्या टिळक रस्त्याच्या जागी येऊन स्थिरावली आणि फर्ग्युसन महाविद्यालय सध्या आहे त्या ठिकाणी. आता गजबजलेला हा परिसर त्यावेळी मात्र गावाबाहेर होता. २० जून १८८८ च्या तत्कालीन व्यवस्थापक मंडळात महाविद्यालयाची इमारत गावाबाहेर चतुशृंगीच्या माळावर उभारावी असा प्रस्ताव ‘टिळकांनी मांडला त्याला अनुमोदन दिले आगरकरांनी आणि पाठिंबा दिला आपट्यांनी अशी या तिघांतल्या संपूर्ण एकमताची एक दुर्मिळ घटना घडली.’

१८९१ मध्ये ही जमीन संस्थेकडे आल्यानंतर लगेचच ११ जानेवारी १८९२ दिवशी कोनशिला स्थापन झाली. प्रमुख पाहुणे होते तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर नेक नामदार जॉर्ज रॉबरट कॅनिङ्ग हॅरिस.

१८९२ मध्ये प्राचार्य आपटे यांच्या अकाली निधनानंतर गोपाळ कृष्ण गोखले यांनी संस्थेच्या कार्यवाहपदाची जबाबदारी स्वीकारली आणि इमारतीच्या निधीसाठी संभाव्य देणगीदारांना भेटण्यासाठी मुंबई, उर्वरित महाराष्ट्र, कर्नाटक तसेच गुजरातभर प्रवास केला. अनेक चांगले संबंध जोडले निधीही मिळवला. स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करत दैनंदिन कामावर विपरित परिणाम न व्हावा म्हणून त्यांनी आपल्या सगळ्या सुट्ट्यांचा उपयोग या कामासाठी केला. इमारतीसाठीचा निधी बव्हंशी सार्वजनिक देणग्यांतून संस्थेने उभारला त्यातला सिंहाचा वाटा गोपाळ कृष्ण गोखले यांचा होता. १८९१ मध्ये संस्थेत परिषद सदस्य रूपाने रावबहादूर वासुदेव बापुजी कानिटकर यांचा प्रवेश झाला. पुण्यातले रे मार्केट म्हणजे आताची फुले मंडईसह अनेक वैशिष्ट्यपूर्ण वस्तूंचे रचनाकार म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या रा. ब. कानिटकारांनी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वास्तूचे आरेखनापासून बांधकामापर्यंत सर्व काम पार पाडले. १८८८ मध्ये केलेल्या अंदाजानुसार महाविद्यालयाच्या इमारतींसाठी जवळजवळ अडीच लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित होता. पैकी मेन बिल्डिंग, हॉस्टेल, कालव्यावरचे दोन पूल, प्राचार्य बंगला, सेवक निवास, रस्ते, कुंपणे, पाणी व्यवस्था असे मिळून प्रत्यक्षात एक लक्ष पंचावन्न हजार रुपयांचा खर्च झाला. मधेमधे आवारात झाडे लावणे, त्यासाठी पंप आणणे, कोनशिला समारंभ अशा गोष्टींवर परिषदेच्या मान्यतेने सहाशे रुपयांपर्यंतचा खर्चही केला गेला. सुमारे तीन वर्षांनी या वास्तूचे बांधकाम पूर्ण झाले. अधिकृत उद्घाटनापूर्वी वेळात वेळ काढून सर जेम्स फर्ग्युसन यांनी १३ फेब्रुवारी १८९५ या दिवशी भेट दिली होती. आणि २७ मार्च १८९५ त्या वर्षीचा गुढी पाडव्याचा दिवस. या दिवशी तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड सँडहरस्ट यांच्या हस्ते या इमारतीचे उद्घाटन झाले. संस्थेचे अध्यक्ष श्रीशाहू छत्रपती महाराज स्वतः या समारंभास उपस्थित होते आणि त्यांनी स्वतः पाहुण्यांचे स्वागत केले. मुख्य इमारतीपासून हॉस्टेल इमारतीपर्यंत मोठा मंडप होता. ३००० च्या क्षमतेचा मंडप गर्दीने ओसंडून गेला होता. पुण्यातले सर्व प्रतिष्ठित नागरिक, विद्वतजन, संस्थानिक मंडळी असे सगळे आवर्जून उपस्थित होते. आज या घटनेला १२५ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणून काढलेली ही थोडी दीर्घ आठवण.

संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल साताराचा आणि फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी, शिक्षक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा आजीव सदस्य, कार्यवाह अशा विविध भूमिकांत ५० वर्षांचा काळ गेल्यानंतरही अजून त्या जादूतून बाहेर पडता येत नाही. कारण तसे करायची इच्छाच नाही.

# श्री. प्रदीप ज. भिडे : जीवेत् शरदः शतम् !

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक व माजी अध्यक्ष आणि दूरदर्शनचे प्रसिद्ध ज्येष्ठ वृत्तनिवेदक श्री. प्रदीप ज. भिडे यांना ९ नोव्हेंबरला ६७ वर्षे पूर्ण होत आहेत. दूरदर्शनवर वृत्तनिवेदन व जाहीर समारंभामध्ये सूत्रसंचालन ह्या क्षेत्रामध्ये गेली ३५ वर्षेआपला ठसा उमटविणारे श्री. प्रदीपजी यांना वाढदिवसाच्या आम्हा समस्त भिडे परिवाराकडून भरभरून व शतायुषी शुभेच्छा !**

लोकांना कुठे काय चाललंय हे जाणून घेण्याची फार उत्सुकता असते. प्रसारमाध्यमांचं माहात्म्य दिवसेंदिवस वाढत आहे. सूत्रसंचालन, वृत्तनिवेदन ह्या व्यवसायांना देखील एक वलय प्राप्त झालं आहे. श्री. प्रदीप भिडे हे ह्या व्यवसायामधे गेली २५ वर्षे सातत्याने काम करीत आहेत.



मुंबई दूरदर्शन केंद्राची सुरुवात २ ऑक्टोबर, १९७२ रोजी झाली. श्री. प्रदीप भिडे हे एप्रिल १९७४ पासून दूरदर्शनमधे दाखल झाले. स्व. भक्ती बर्वे-इनामदार, ज्योत्स्ना किरपेकर, स्व. स्मिता पाटील-बब्बर हे सारे प्रदीप भिडे यांचे समकालीन तसेच समव्यावसायिक. त्या काळात मराठी बरोबरच हिंदी, इंग्रजीमधूनही बातम्या दिल्या जात. १९८४ पासून जेव्हा नॅशनल नेटवर्क सुरू झाले, तेव्हापासून हिंदी व इंग्रजी बातम्या दिल्लीहून प्रसारित केल्या जाऊ लागल्या. वयाच्या २१ व्या वर्षी श्री. भिडे यांनी बातम्या द्यायला सुरुवात केली. दूरदर्शनच्या वृत्त विभागामध्ये अनुवादक म्हणून त्यांनी सुरुवात केली. सुरुवातीपासूनच मराठी वाङ्मय, नाटके, कादंबऱ्या, एकांकिका या विषयांमध्ये त्यांना विशेष रुची होती. प्रसार माध्यमात करियर सुरू करावं असा पहिल्यापासूनच त्यांचा मानस होता. एका चांगल्या वृत्तनिवेदकाला आवाजाबरोबरच भाषेवर प्रभुत्व मिळविणे जरुरी ठरते. संस्कृत भाषा ही मृत भाषा मानण्याचा प्रघात असला तरी, संस्कृतमधील श्लोक पठण, उच्चारण यांमुळे वाणी स्पष्ट होते. शब्दांचा उच्चार कसा करायचा असतो, मोठा शब्द बोलताना, कुठे तोडायचा असतो हे भाषिक बारकावे आत्मसात करणे श्रेयस्कर. अर्थाप्रमाणे विराम घेऊन शब्दफेक करता आली पाहिजे, असे सांगून श्री. भिडे यांनी 'बातमी सादर करताना सरळसोट वाचली तर नीरस आणि परिणामशून्य होते, यासाठी शब्दभांडार हवे. बालसुलभ कुतुहल हवे. बातम्या तटस्थपणे, पण आवाजात आवश्यक तो चढउतार, मार्दव निर्माण करून सादर केल्या तर त्या परिणामकारक होतात' अशी माहिती दिली. व्हॉईस कल्चर व यशस्वी निवेदक म्हणून काम करताना, योगातील क्रियांचा उपयोग होतो, असं मत व्यक्त करताना श्री. भिडे यांनी असं सांगितलं की त्यांनी व्यक्तीशः तसे खास प्रयत्न केले नाहीत. ते शाकाहारी असून, सिगरेट वा तत्सम व्यसन त्यांना नाही, तसेच तेलकट पदार्थ खाण्याची मुळातच आवड नाही, त्यामुळे आपसूकच आवाज टिकून राहिला. गेली २५ वर्षे दूरदर्शनवरून त्यांनी वृत्तनिवेदन केलं. पण तरीही ते अजून थकलेले नाहीत की श्रोते वा प्रेक्षक त्यांना कंटाळले नाहीत.

शाळा-कॉलेजच्या दिवसांतील मराठीच्या ओढीमुळे अनेक कादंबऱ्या व इतर पुस्तके त्यांनी वाचली. त्या बहुश्रुततेचा त्यांना सदैव फायदाच झाला. कायमची व्यक्त होणारी रड असली, तरी आज वाचन संस्कृती निकालात निघाली आहे, ही वस्तुस्थिती आहे व त्याबाबतची खंत त्यांनी व्यक्त केली. नाटकांमधून कामं करताना, ते रत्नाकर मतकरी, रवी पटवर्धन यांच्या संपर्कात आले. त्यांच्या निवेदनातील कारकीर्दीचा एक 'बेस' आपसूकच तयार होत होता. दूरदर्शनच्या त्या वेळच्या संचालकांच्या, श्री. शास्त्रींच्या प्रोत्साहनामुळे, ते बातम्यांच्या अनुवादाबरोबरच इतरही कामांत रस घेऊ लागले. प्रौढ साक्षरतेच्या विषयावरील एका मालिकेमध्ये ३२ ते ३३ भाग त्यांनी शिक्षकाची भूमिका वढविली. हळूहळू 'निर्मिती सहाय्यक' म्हणून ते काम करू लागले. श्री. शास्त्री तसेच त्यांच्या नंतरच्या श्री. ल. गो. भागवत या दोन्हीही दूरदर्शनच्या संचालकांकडून खूप शिकायला मिळालं. एकीकडे निर्मिती सहाय्यक म्हणून काम पाहात असतानाच वृत्तनिवेदन देखील सुरू होते. कार्यक्रम निर्मिती करताना, पाल्हाळ न लावता अचूक वेध घेऊन प्रभावीपणे घटना सादर करणं महत्त्वाचं. नेटकेपणा, वेळच्या वेळी काम आणि शिस्त या साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या. व्यवस्थापनविषयक सर्व कार्यक्रम संकलित करणे, असे कार्यक्रम इंग्रजीमधून असल्यामुळे इंग्रजी व हिंदी बातम्यांसाठी काम करणे, मुलाखत घेणे, बाह्यचित्रीकरण या साऱ्यांतून लघुपट तयार करण्याची कला भिडे यांनी आत्मसात केली. 'कामगार विश्व', त्यातून निरनिराळ्या उद्योग समूहांच्या व्यवस्थापनाशी संपर्क, सदाशिवराव निंबाळकर यांची योगविषयक मालिका, यातून कसकसा विकास झाला, याची माहिती ते देत राहिले.

बातम्या देण्यातलं थ्रील मोठं आहे. एकंदर २५ वर्षांच्या बातम्या देण्याच्या अनुभवामध्ये नेमक्या धक्कादायक, दुःखद किंवा चित्तथरारक बातम्या देण्याचा प्रसंग श्री. भिडे यांच्यावर अनेक वेळा आला. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या, ख्यातनाम पार्श्वगायक महम्मद रफी यांचे निधन, मुंबईचा भीषण बॉम्बस्फोट अशा घटनांची बातमीपत्रे श्री. भिडे यांनीच वाचली. निवेदकाने अशा वेळी भावनाविवश होता कामा नये. त्रयस्थाच्या भूमिकेतून तटस्थ राहून बातम्या सादर करणे आवश्यक. निवेदकाला व्यक्तीशः आनंद झाला वा दुःख झाले तरी त्याला भावनांचे प्रदर्शन करता येत नाही. अलिप्तपणा म्हणजे कोरडेपणा नव्हे. पण आवश्यक त्या भावभावनांतून भिजलेली बातमी लोकांच्या कानावर पडायला हवी.

२१ मे १९९१, भारतात श्रीपेरुंबदूर येथे राजीवजींची हत्या झाली. वृत्त संपादिका विजया जोशी यांनी भिडे यांना 'असशील तसा त्वरित निघून ये' म्हणून सांगितलं. ही बातमी मुंबईत वाऱ्यासारखी पसरली होती. मुंबई बंद. सर्वत्र स्मशान शांतता. पोलिसांच्या जीपने भिडे दूरदर्शन केंद्रावर आले. सकाळी ६.३० वाजता त्यांनी बातमी वाचली. तटस्थपणे बातमी वाचताना देखील अगदी नकळतपणे तिला एक कारुण्याची झालर होती. 'आपला आवाज आमचं काळीज चिरत गेला' अशा प्रतिक्रिया त्यांना बातमी झाल्या झाल्या लगेचच मिळाल्या. १९९४ चा बॉम्बस्फोट झाल्यावर त्या दिवशी

साडेसात वाजता बातम्या देण्याची जबाबदारी भिडे यांची होती. प्रसंगाचं गांभीर्य ओळखून ते दुपारी दीड वाजताच निघाले. रेल्वेने, पायी पायी असा प्रवास (अंधेरी ते वरळी) त्यांनी केला व सायंकाळी ५ वाजता पोहोचले. बातमी परिणामकारकरित्या सादर केली. त्याही परिस्थितीमध्ये लोकांनी त्यांच्या अचूक वृत्तनिवेदनाला दाद दिली.

महम्मद रफी यांच्या निधनाच्या बातमीलादेखील कारुण्याची छटा होती. भिडे यांनी ही बातमी सादर केली तेव्हाही त्याला अशीच दाद मिळाली. नाट्यपूर्ण वाटणार नाही, आनंद वा दुःखाचं प्रदर्शन वाटणार नाही आणि तरीही ती बातमी रुक्ष वाटणार नाही, याचं अवधान निवेदकाला ठेवावं लागतं. यानंतर १९७८ साली ते ई. मर्क या जर्मन कंपनीमध्ये 'जनसंपर्क अधिकारी' म्हणून काम पाहू लागले. दोन वर्षांनी त्यांनी हिंदुस्थान लिव्हर्समध्ये वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले. देश-विदेश दौरे, एकट्याच्या जबाबदारीवर अनेक अवघड काम पार पाडणे, हे सारे करतानादेखील वृत्तनिवेदन सुरू राहिलं होतं. जनसंपर्क अधिकारी असताना भिडे यांचा देशविदेशच्या बड्या मंडळींशी, पत्रकारांशी, नामवंतांशी संपर्क आला. सृजनशीलता वाढीस लागली. त्याचा परिपाक म्हणजे स्वतःचं काहीरी वेगळं करावं, स्वतंत्र व्यवसाय करावा हा निर्णय त्यांनी घेतला. आपल्या कन्येच्या नावानं त्यांनी 'प्रियंका स्टुडिओ' सुरू केला. हा डिजिटल साऊंड सिस्टीमचा स्टुडिओ असून अद्ययावत यंत्रसामग्रीने परिपूर्ण आहे. कॉम्प्युटर पद्धतीने येथे ध्वनिमुद्रणाची सोय असून निरनिराळ्या साऊंड ट्रॅक्सचं मिक्सिंग येथून करतात आणि हवा तसा 'इम्पॅक्ट' मिळवतात. फिल्म निर्माते, जाहिरात निर्माते इथे बुकिंग करून आपापले रेकॉर्डिंग करून घेतात. श्री. भिडे स्वतःदेखील निरनिराळ्या कॉर्पोरेट फिल्म्स बनवितात. कॉर्पोरेट फिल्म्स बनविताना, संकल्पना त्यांची असते. ध्वनिमुद्रण अर्थातच त्यांच्या स्टुडिओमध्ये होतं परंतु कॅमेरा व इतर जरुरी ते तंत्रज्ञ ते मागवून घेतात.

एक परिचित चेहरा असल्यामुळे खाजगी आयुष्यात अडचणी येतात का ? याबाबत त्यांनी नकारात्मक उत्तर दिलं. अगदी सहज हवा तिथे वडापाव खाणं, वा पर्यटन करणं अशा कुठल्याही गोष्टी ते मनमोकळेपणे करतात. लोकसंग्रह करण्याची त्यांची आवड असल्याने, त्यांना कधीही प्रसिद्धीचा बाऊ वाटला नाही.

**सौजन्य - विकीपिडिया (सौ. अनघा दिघे)**

---

# कपि तो उडाला

**- श्री. राजेंद्र भिडे,**
मो. ९९२०९६९३२८, दादर.

लहान असताना आम्ही संध्याकाळी शुभंकरोती म्हणायचो, आणि चौथा श्लोक असायचा - 'उडाला उडाला कपि तो उडाला। समुद्र उलटोनी लंकेसी गेला। लंकेसी जाऊनी विचार केला। नमस्कार माझा तया मारुतीला॥' लहान असताना खरंच कळलं नाही, पण आता समजून घ्यायचा प्रयत्न करतोय, की मारुतीरायांनी काय विचार केला असेल ? कुणीतरी मला सुंदरकांड वाचायला दिलं, पण गोस्वामी तुलसीदासजींनी ते अवधी भाषेमध्ये लिहिल्यामुळे स्वतःहून समजून घेणं थोडं कठीण होतं. म्हणून मराठी अनुवाद वाचला. मग थोडासा अंदाज आला की, मारुतीरायांनी काय विचार केला असेल. महाबली हनुमान म्हणजे प्रत्यक्ष रुद्रावतार. पण त्यांनी कधीही आवश्यकता नसताना आपल्या शक्तींचा प्रयोग केला नाही. प्रभू रामचंद्रांची भक्ती, त्यांनी कधी त्यांचा सेवक होऊन, तर कधी दूत बनून केली. जाम्बुवंताच्या प्रेरणेने समुद्र उड्डाणाची तयारी केली आणि सीतामातेला ते शोधायला निघाले. जबाबदारी एवढी मोठी होती की संपूर्ण वानरसेना त्यांच्याकडे आशेने पाहत होती आणि काम होते ते कधीही न पाहिलेल्या सीतामातेला शोधायचे. पण त्यांचा निर्धार पक्का होता, मनात यत्किंचितही शंका नव्हती. विचार हाच की, हे श्रीरामाचं काम आहे आणि त्याची पूर्तता त्यांच्याच शुभाशीर्वादाने होईल. समुद्रावरून जाताना मैनाक पर्वताने त्यांना क्षणभर विश्रांतीसाठी विनंती केली. पण मारुतीरायांनी त्याला नम्रपणे धन्यवाद देऊन ते पुढे गेले. लक्ष्यपूर्ती होईपर्यंत विश्राम करून चालणार नाही असाच विचार त्यांनी केला असेल. पुढे त्यांची वाट सुरसा नावाच्या समुद्र सर्पिणीने अडवली. ती तोंड उघडून हनुमानाला म्हणाली, 'आता तुझी सुटका नाही.' मारुतीरायांनी आपला आकार मोठा केला, तर तिने अजून मोठं तोंड उघडलं. तेव्हा मारुतीरायांनी विचार केला, आता आकार मोठं करून चालणार नाही. त्यांनी हुशारीने आणि सूक्ष्म रूप घेतलं. तिच्या जबड्यातून बाहेर आले. आपल्या जीवनात आलेल्या संकटांना नेहमी हुशारीने तोंड द्यायचं असतं. स्पर्धात्मक वृत्ती असलेल्या लोकांबरोबर स्पर्धा करण्यात वेळ न घालवता सर्व शक्ती व बुद्धी आपली लक्ष पूर्ती करण्यासाठी राखून ठेवायची असते. प्रत्येक वेळी बळाचा वापर गरजेचा नसतो. पुढे गेल्यावर त्यांना कोणीतरी पकडतंय असा भास झाला. सिंहिका नावाच्या समुद्री राक्षसीने पाण्यातून त्यांची समुद्रात पडलेली सावली पकडली होती आणि ते सिंहिकाच्या तोंडात खेचले जात होते. इथे मारुतीरायांनी परत विचार करून अनुभवाचा वापर केला आणि अगदी लहान रूप घेतल्याने त्यांची सावली पण लहान झाली. मारुतीराया विजेच्या वेगाने सिंहिकाचं पोट फाडून बाहेर आले. माणसाचं व्यक्तिमत्त्व जेवढं मोठं तेवढी त्याची काळी सावली किंवा अवगुण चटकन दिसून येतात. म्हणून आपण आपल्या सामाजिक किंवा व्यक्तिगत जीवनात व्यक्तिमत्त्व संतुलित राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपला मोठेपणा प्रत्येक वेळी न दाखवता साधेपणाने लहान होऊन समोरच्याला जिंकून जायचं असतं. लंका नगरीत प्रवेश करताना त्यांनी एखाद्या किटकाप्रमाणे लहान रूप घेतलं. प्रवेशद्वाराशी लघुरूपातल्या हनुमानाला लांकिनी नावाच्या राक्षसीने थांबवलं आणि ओरडली 'तुझ्यासारखे पशुपक्षी तर माझा आहार आहेत. मी असताना तू लंकेचं प्रवेशद्वार पार करू शकत नाहीस.' तिच्या अहंकारी आवाहनाला उत्तर देण्यासाठी आता मात्र त्यांनी बळाचा वापर केला आणि एका मुष्टिका प्रहाराने तिला जमीनदोस्त केलं. अहंकार हा सर्व विकारांचा राजा. क्षणिक अहंकार सुद्धा आपल्याला आपले कर्तव्य विसरायला लावू शकतो म्हणून त्याला क्षणभरसुद्धा जवळ येऊ द्यायचं नाही. हनुमंतांनी लंका भूमीवर पाय ठेवला आणि सुमेरू पर्वतावरून सोनेरी कौल असलेली घरं आणि महाल पाहिले. घरामध्ये सुंदर स्त्रिया पाहिल्या, कुठे फळाफुलांचा सुगंध तर कुठे मदिरा पाहिली. पण ह्या सगळ्यामुळे ते अजिबात मोहित झाले नाहीत. (पान ९ वर)

# भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## ऑक्टोबर

१. सौ. वृंदा अनिल भिडे, पुणे १
२. श्रीमती लक्ष्मी माधव भिडे, माभळे १
३. कु. प्राची संजय भिडे, माणगांव ७
४. कु. प्रिती संजय भिडे, माणगांव ७
५. श्री. मकरंद गोविंद भिडे, कल्याण ७
६. कु. प्राजक्ता सुरेंद्र भिडे, ठाणे ७
७. श्री. मकरंद गणेश भिडे, मिरज ७
८. सौ. अश्विनी अनिरुद्ध भिडे, पनवेल ८
९. केतकी सिद्धार्थ भिडे, सांगली ८
१०. श्री. शरद प्रभाकर भिडे, चिपळूण ९
११. श्री. यशवंत रामचंद्र भिडे, औरंगाबाद ९
१२. श्री. शेखर केशव भिडे, माभळे १२
१३. सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे १२
१४. अनुजा माधव भिडे, डोंबिवली १२
१५. श्री. गणेश महादेव भिडे, पुणे १३
१६. कु. ऋषभ विक्रम भिडे, हैद्राबाद १५
१७. श्री. रमेश महादेव भिडे, डोंबिवली १६
१८. श्री. रोहन सुनिल भिडे, पुणे १६
१९. श्रीमती प्रज्ञा वसंत भिडे, रत्नागिरी १७
२०. सौ. जान्हवी विवेक भिडे, रत्नागिरी १७
२१. सौ. माधवी प्रसाद भिडे, ठाणे १७
२२. सौ. अपर्णा शरद भिडे, सांगली १७
२३. मिहीर माधव भिडे, डोंबिवली १८
२४. सौ. प्रियांका सुरेंद्र भिडे, ठाणे १९
२५. श्री. अमित रवींद्र भिडे, कल्याण १९
२६. श्री. मधुकर लक्ष्मण भिडे, मालाड १९
२७. श्री. अमेय अरविंद भिडे, पुणे २१
२८. श्री. माधव काशिनाथ भिडे, मुंबई २१
२९. श्री. चिंतामण नरहर भिडे, पुणे २१
३०. श्री. हर्षवर्धन श्रीकृष्ण भिडे, पुणे २२
३१. सौ. संध्या बळवंत भिडे, अंमळनेर २२
३२. श्री. चारुदत्त प्रभाकर भिडे, माभळे २३
३३. कु. सुप्रिता प्रसन्न भिडे, मुंबई २४
३४. डॉ. मीनल महेश भिडे, पुणे २४
३५. श्री. प्रकाश शंकर भिडे, डोंबिवली २५
३६. श्री. सचिन बळवंत भिडे, अंमळनेर २५
३७. श्री. केदार गोविंद भिडे, माभळे २८
३८. सौ. नमिता नितीन भिडे, कल्याण २८
३९. सौ. मुग्धा प्रसाद भिडे, माभळे २८
४०. सौ. स्मिता श्रीधर भिडे, चिपळूण २९
४१. श्री. मिहीर नितीन भिडे, पुणे ३०
४२. श्री. बाळकृष्ण त्रिंबक भिडे, पुणे ३०

## नोव्हेंबर


१. श्री. विठ्ठल दत्तात्रय भिडे, डोंबिवली १
२. कु. धनंजय मुकुंद भिडे, बेळगांव १
३. सौ. ज्योती जगदीश भिडे, बोरिवली १
४. श्री. धनंजय काशिनाथ भिडे, खालापूर २
५. कु. नृपजा सुनिल भिडे, पुणे २
६. डॉ. संतोष शंकर भिडे, पुणे २
७. सौ. नीला नंदकुमार ताम्हनकर, सांगली २
८. श्री. राजेंद्र वासुदेव भिडे, डोंबिवली ३
९. सौ. सुलभा श्रीकृष्ण भिडे, पुणे ३
१०. कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली ३
११. सौ. विदुला विनायक भिडे, गुजरात ४
१२. सौ. गिरिजा गणेश भिडे, पुणे ४
१३. श्री. परेश प्रशांत भिडे, पुणे ५
१४. श्री. सतिश जनार्दन भिडे, गिरगांव ५
१५. सौ. वर्षा विलास भिडे, मालाड ६
१६. श्री. शार्दुल सतीश भिडे, पुणे ६
१७. सौ. शितल सतीश गांगल, गोरेगांव ७
१८. यश अनिल भिडे, पुणे ७
१९. श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे, पुणे ८
२०. सौ. सुवर्णरेखा आदित्य देवधर, पुणे ८
२१. श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे, मुंबई ९
२२. श्री. संजीव केशव भिडे, पुणे ९
२३. सौ. वृषाली पंकज भिडे, कर्नाटक ९
२४. श्री. संदीप बळवंत भिडे, अंमळनेर ११
२५. श्री. अनिल महादेव भिडे, भोपाळ ११
२६. श्री. धुंडिराज दत्तात्रय भिडे, पंढरपूर ११
२७. श्री. गिरीश शरद भिडे, विलेपार्ले १२
२८. श्री. केदार सुभाष भिडे, मालाड १२
२९. सौ. वीणा सच्चिदानंद वेलणकर, पुणे १२
३०. सिद्धार्थ दत्तात्रय भिडे, सांगली १३
३१. श्री. सचिन श्रीकांत भिडे, पुणे १४
३२. श्री. श्रीपाद श्रीकांत भिडे, तळेगाव दाभाडे १५
३३. श्री. चंदन चिंतामण भिडे, पुणे १६
३४. कु. राजश्री माधव भिडे, पुणे १८
३५. श्री. चंद्रकांत शंकर भिडे, ठाणे १९
३६. सौ. शोभा शरद भिडे, पुणे १९
३७. श्री. अमेय नरेंद्र भिडे, पुणे १९
३८. श्री. तेजस राजाराम भिडे, अलिबाग २०
३९. श्री. अजित चिंतामणी भिडे, पुणे २०
४०. श्री. सतीश केशव भिडे, विलेपार्ले २३
४१. कु. स्वप्नाली प्रसन्न भिडे, मुंबई २३
४२. श्री. केदार प्रभाकर भिडे, पुणे २३
४३. सौ. सुचेता मधुकर भिडे, रायगड २४
४४. श्री. अविनाश मधुकर भिडे, पुणे २५
४५. श्री. योगेश शरद भिडे, पुणे २५
४६. सौ. प्रिती विवेक पाटणकर, पुणे २५
४७. श्री. एस. ए. कृष्णा भिडे, कर्नाटक २५
४८. श्रीमती सविता नरेंद्र भिडे, पुणे २६
४९. श्री. सुनिल सुरेश भिडे, पुणे २६
५०. आशीर्वाद राजेंद्र भिडे, दादर २६
५१. सौ. मालिनी शरद भिडे, चिपळूण २९
५२. श्री. कपिल गोपाळकृष्ण भिडे, मिरज २९
५३. श्री. सुहास सुभाष भिडे, सोलापूर ३०
५४. श्री. गुरुनाथ श्रीधर भिडे, चिपळूण ३०
५५. कु. देवयानी नितीन भिडे, पुणे ३०

## डिसेंबर

१. सौ. लता वसंत भिडे, ठाणे १
२. सौ. ज्योत्स्ना शरद भिडे, पुणे १
३. कु. जय प्रवीण भिडे, गोवा २
४. श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली २
५. सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे, मालाड २
६. सौ. शुभदा रामचंद्र भिडे, सांगली २
७. श्री. सुरेंद्र बळवंत भिडे, ठाणे ३
८. श्री. वीरेंद्र विश्वनाथ भिडे, पुणे ४
९. श्री. सिद्धेश्वर बाळकृष्ण भिडे, पुणे ४
१०. कु. ऋतुजा गणेश भिडे, पुणे ४
११. श्री. अविनाश वासुदेव भिडे, पुणे ५
१२. श्री. वामन नरहर भिडे, पुणे ५
१३. श्री. दिलीप जगन्नाथ भिडे, पुणे ५
१४. श्री. सदानंद यशवंत भिडे, कांदिवली ६
१५. श्री. विक्रम दिलीप भिडे, पुणे ६
१६. श्री. रोहित प्रकाश भिडे, डोंबिवली १०
१७. सौ. मोहिनी मंदार भिडे, पनवेल १०
१८. श्री. अनिल निळकंठ भिडे, पुणे ११
१९. सौ. कविता प्रवीण भिडे, पुणे १४
२०. श्री. अजय माधव भिडे, बोरिवली १४
२१. श्री. प्रशांत त्रिंबक भिडे, पुणे १५
२२. श्री. सुभाष वामन भिडे, मालाड १७
२३. श्रीमती चित्रा चंद्रकांत करंदीकर, रत्नागिरी १८
२४. श्री. चैतन्य आनंद भिडे, नाशिक २०
२५. श्री. सुभाष विनायक भिडे, पुणे २०
२६. सौ. सुरश्री चंदन भिडे, पुणे २१
२७. श्री. अनिरुद्ध मोरेश्वर भिडे, सांगली २१
२८. श्री. श्रीकृष्ण विश्वनाथ भिडे, मालाड २२
२९. श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे, मालाड २२
३०. सौ. गायत्री केदार भिडे, डोंबिवली २३
३१. श्री. दिलीप रघुनाथ भिडे, मुंबई २४
३२. सौ. वंदना अरविंद भिडे, पुणे २४
३३. सौ. स्मिता विजय गांगल, गोरेगांव २४
३४. कु. राजस माधव भिडे, पुणे २४
३५. सौ. प्रज्ञा प्रभाकर भिडे, माभळे २४
३६. सौ. अर्चना संजय भिडे, मालाड २५
३७. श्री. गिरीश दत्तात्रय भिडे, पुणे २५
३८. श्री. दिलीप वासुदेव भिडे, पुणे २६
३९. श्री. नितीन दिवाकर भिडे, कल्याण २६
४०. श्री. विक्रम विलास भिडे, २६
४१. श्री. विवेक मुकुंद भिडे, पवई २६
४२. श्री. गोविंद मुकुंद भिडे, डोंबिवली २७
४३. श्री. राजस नितीन भिडे, कल्याण २७
४४. श्री. प्रकाश गोपाळ भिडे, मिरज २७
४५. श्री. संदीप शरद भिडे, पुणे २८
४६. श्री. रमेश पुरुषोत्तम भिडे, मुलुंड २८
४७. श्री. चारुचंद्र चिंतामणी भिडे, पुणे २९
४८. सौ. विजयश्री मिलींद भिडे, पुणे २९

# सायबर गुन्हे तपास अधिकारी

श्री. रवींद्र भिडे, मुंबई
मो. ९९६९४१०६९९



२६/११ (२६-११-२००८) या अतिरेकी हल्ल्याचा तपास आम्ही नुकताच संपविला होता. त्यातील आरोपी अजमल कसाब व इतर यांचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते आणि त्या अनुषंगाने जी कामे बाकी होती ती करण्यात आम्ही मग्न होतो. अजून सदर केसची प्रत्यक्ष सुनावणी कोर्टात सुरू झाली नव्हती. दिनांक २८ मे, २००९ रोजी दुपारच्या सुमारास मला गुन्हे शाखेचे सहपोलीस आयुक्त श्री. राकेश मारिया यांनी त्यांचे कार्यालयात बोलावले. युनिट १ गुन्हे शाखेचे कार्यालय हे सहआयुक्तांच्या बाजूच्याच इमारतीत होते. मी आणि माझे सहाय्यक अधिकारी असे, २६/११ च्या तपासातील काही कागदपत्रे घेऊन श्री. मारिया साहेब यांच्या दालनात हजर झालो. त्यांनी फक्त मला तिथे थांबायला सांगून माझ्या बरोबरचे सर्व अधिकाऱ्यांना कागदपत्रांसह परत जाण्यास सांगितले. त्यानंतर श्री. मारिया यांनी मला सांगितले की आपल्याला आता तत्काळ पोलीस आयुक्त साहेबांना भेटायचे आहे. त्यानुसार श्री. मारियासाहेब आणि मी पोलीस आयुक्त श्री. हसन गफूरसाहेब यांचे कार्यालयात दाखल झालो. आम्ही पोलीस आयुक्तांसमोर जाताच श्री. मारियासाहेबांनी पोलीस आयुक्तांना सांगितले वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिडे हे एक जूनपासून सायबर पोलीस ठाणे चालू करीत आहेत. हे ऐकताच पोलीस आयुक्त साहेबांनी या प्रस्तावाला मान्यता दिली आणि मला त्याच दिवशी जाऊन बीकेसी येथे सायबर पोलीस ठाणे येथे कार्यभार स्वीकारण्यास सांगितले. आम्ही पोलीस आयुक्तसाहेबांचे दालनातून बाहेर पडताच, मी श्री. मारियासाहेबांना सांगितले की मला मायक्रोसॉफ्ट वर्ड मायक्रोसॉफ्ट एक्सेल याची थोडीफार माहिती आहे, तसेच संगणकाबद्दल सुद्धा थोडी माहिती आहे परंतु सायबर पोलीस ठाणे चालविण्याकरिता आवश्यक असलेले सायबर फॉरेन्सिकचे ज्ञान मला नाही. परंतु यावर श्री. मारियासाहेबांनी एकच वाक्य उच्चारले 'सिख जाओगे.' त्यांनी माझ्यावर दाखविलेला हा विश्वास माझे मनोबल उंचावण्यास पुरेसा होता.

आमचे युनिट-१ चे कार्यालयात परत आल्यावर, मी माझ्या सर्व वस्तू गोळा केल्या आणि तात्काळ सहपोलीस आयुक्तांच्या कार्यालयात जाऊन, माझे सायबर पोलीसठाणे येथे वरिष्ठ पोलीस निरिक्षक म्हणून झालेला कार्यालयीन आदेश प्राप्त केला. त्यानंतर विनाविलंब मी बीकेसी पोलीसठाणे मुंबई येथे जाऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सायबर पोलिसठाण्याचा मुख्य म्हणून पदभार स्वीकारला. अद्याप सायबर पोलिसठाणे कार्यान्वित झालेले नव्हते. महाराष्ट्रातील सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन, फक्त सायबर गुन्ह्यांचा तपास करण्याकरिता हे पोलिसठाणे निर्माण करण्यात येत होते. मी तेथे चार्ज घेण्याच्या अगोदर सुमारे पंधरा दिवस आधी, माझे सहकारी पोलीस निरिक्षक नंदकिशोर मोरे यांनी तेथे रिपोर्ट करून जागेचा ताबा घेतला होता. त्याचप्रमाणे आवश्यक ते फर्निचर, तसेच स्टेशनरी, रजिस्टर्स वगैरेचा ताबा त्यांनी घेतला होता. याआधी मला दोन पोलिसठाणी नव्याने कार्यान्वित करण्याचा अनुभव होता. एक होते विक्रोळी पार्क साइट आणि दुसरे धारावीतील शाहूनगर पोलीस स्टेशन. परंतु सायबर पोलीस स्टेशन स्थापन करणे हे खरोखरच एक मोठे आव्हान होते. कारण आतापर्यंत मी व माझे सर्व सहकारी हे पारंपरिक पद्धतीने होणारे गुन्हे शोधण्यात पारंगत झालो होतो, परंतु सायबर गुन्हा कशा प्रकारे करतात, ते गुन्हे कसे समजून घ्यायचे आणि त्या गुन्ह्यांची उकल कशी करायची याबाबत आम्ही सारेच पूर्णतः अनभिज्ञ होतो. परंतु स्वीकारलेले काम पूर्णत्वास नेणे अशी माझी आणि माझ्या सायबर पोलिसठाणे येथील सर्व सहकाऱ्यांची मानसिकता असल्यामुळे आम्ही पूर्ण आत्मविश्वासाने याबाबत कारवाई चालू केली. आम्हाला सतत पोलीस आयुक्त श्री. हसन गफूरसाहेब, सहआयुक्त श्री. मारिया आणि अप्पर पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले. पोलीस उपायुक्त श्री. सुखानंद साबदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संजय जाधव हे सुद्धा अतिशय योग्य प्रकारे आम्हाला मार्गदर्शन करीत होते. पोलीस निरिक्षक श्री. मुकुंद पवार यांनी सुद्धा या कामी मोलाची मदत केली. सायबर पोलिसठाण्याचा मुख्य गाभा हा, माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० आणि त्यात आलेल्या सुधारणा २००९, यावर मुख्यत्वे आधारित होता. तसेच त्या अनुषंगाने इतरही कायद्यांची माहिती असणे आवश्यक होते, विशेषतः इंडियन पिनल कोड, क्रिमिनल प्रोसिजर कोड आणि भारतीय पुरावा कायदा. आमच्या पंचवीस-सव्वीस वर्षांच्या पोलीस खात्यातील अभ्यास व अनुभवानुसार आम्हाला हे तिन्ही कायदे जवळजवळ मुखोद्गत होते, परंतु माहिती व तंत्रज्ञान कायदा २०००-२००९ हे शिकणे आता क्रमप्राप्त होते. हा कायदा नवीन असल्यामुळे आमच्या पोलीस ट्रेनिंग कॉलेजमध्ये किंवा त्यानंतरच्या प्रशिक्षणात आम्हाला हा कायदा शिकविण्यात आलेला नव्हता. म्हणून मी व माझ्या सहकाऱ्यांनी सर्वात आधी माहिती व कायदा तंत्रज्ञान कायदा याची पुस्तके विकत घेतली, त्यावर उपलब्ध असलेल्या कॉमेंट्रीची पुस्तके विकत घेतली आणि त्याचा अभ्यास चालू केला. सहआयुक्त श्री. मारिया यांनी आम्हाला या विषयातील जेवढे कोर्सेस करता येतील तेवढे करण्याची मुभा दिली होती आणि त्याकरिता आवश्यक ते आर्थिक सहाय्य मंजूर केले.

१ जून २००९ रोजी औपचारिकरित्या आम्ही सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित केले. सहआयुक्त श्री. राकेश मारिया यांनी त्याचे उद्घाटन केले. याच्या पुढची अवघड वाटचाल आम्हाला स्पष्ट दिसत होती. श्री. मारिया यांनी आम्हाला १ जुलै २००९ पर्यंत, म्हणजे केवळ ३० दिवस, आमचे सायबर विषयक प्रशिक्षणाकरिता वेळ मंजूर केला होता. आम्हीसुद्धा सर्वजण झटून अभ्यास करत होतो, परंतु हा एकांगी अभ्यास आम्हाला पुरेसं ज्ञान, पुरेशी माहिती देत नव्हता. त्यामुळे आम्ही आमचे वैयक्तिक ओळखीने विविध क्षेत्रातील 'सायबर फॉरेन्सिक एक्सपर्ट' यांना सायबर पोलीसठाणे येथे पाचारण करण्यास सुरुवात केली. त्यात विशेषतः नॅसकॉम या संस्थेचे श्री. राजीव वैष्णव, डॉक्टर सामंत आणि ॲड. विकी शहा यांनी आम्हाला त्याबाबत ट्रेनिंग देण्यापासून ते त्यानंतर प्रत्यक्ष गुन्हे उघडकीस आणण्यापर्यंत खूप तांत्रिक मदत केली. त्याचप्रमाणे ॲक्सिस बँकेचे श्री. निरंजन उपाध्याय, आयसीआयसीआय बँकेचे येथे कार्यरत असलेले माजी आयपीएस अधिकारी श्री. नंदकुमार सरवदे यांनीसुद्धा सायबर पोलीस ठाणे येथे येऊन आम्हाला मोलाचे मार्गदर्शन केले. जूनचा संपूर्ण महिना आम्ही रोज विविध आर्थिक क्षेत्रातील, तसेच आय.टी. इंडस्ट्रीतील रिस्क ॲसेसमेंट मॅनेजर, त्यांचे कायदेविषयक तज्ज्ञ अशा विविध

लोकांना सायबर पोलीस ठाणे येथे बोलावून त्यांचेकडून याबाबतचे खूप ज्ञान आणि माहिती उपलब्ध करून घेतली. त्याचप्रमाणे नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे अधिकारी, रिलायन्स टेलिकम्युनिकेशनचे अधिकारी, टाटा टेलिकॉमचे अधिकारी, महानगर टेलिफोनचे अधिकारी यांनी आम्हाला सायबर गुन्हे कसे घडतात याबद्दल माहिती, त्यांचे इंटरप्रिटेशन कसं करायचं याबद्दलची माहिती, तसेच हे गुन्हे उघडकीस कसे आणायचे याबद्दलची सखोल माहिती दिली. एक महिना पूर्ण अभ्यास केल्यानंतर आम्ही १ जुलै २००९ रोजी सायबर पोलीस ठाण्याची पहिली तक्रार (एफआयआर) दाखल करून घेतली. ही तक्रार महाराष्ट्र सरकारची अधिकृत वेबसाईट हॅक झाल्याबद्दलची होती. त्यानंतर आम्ही प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीची सुमारे ८० टक्के चौकशी करून गुन्हा घडला याबाबत आमचे समाधान झाल्यावरच, गुन्हे नोंद करण्यास सुरुवात केली. आमच्या दृष्टीने पोलीस ठाण्यास येणारा प्रत्येक तक्रारदार हा आम्हाला शिक्षकाप्रमाणे वाटत होता. कारण तोच फक्त सांगू शकत होता की गुन्हा कसा घडला आणि त्याच्या कधी आणि कुठे लक्षात आले. त्यामुळे कोणीही तक्रारदार येताच, तो देत असलेली माहिती एका अधिकाऱ्यापुरती सीमित न ठेवता आम्ही सर्व टीम एकत्र जमून त्याची माहिती जाणून घेत होतो. त्यानुसार विविध प्रकारचे गुन्हे कसे घडतात याची आम्हाला माहिती होत गेली. एक तक्रारदार (ज्यांच्या विनंतीनुसार आम्ही त्यांचे नाव सांगू शकत नाही) हे एका आयटी कंपनीचे सायबर सिक्युरिटी प्रमुख होते आणि त्यांचे क्रेडिट कार्डवरून खूप मोठ्या रकमेची उलाढाल त्यांच्या अपरोक्ष करण्यात आल्याबद्दल त्यांची तक्रार होती. आमच्या दृष्टीने ते एक तक्रारदार म्हणून त्यांचे महत्त्व होतेच, परंतु ते आम्हाला अधिक माहिती देऊ शकतील या विचाराने आम्ही सर्व अधिक आनंदित झालो होतो आणि आमच्या विनंतीला त्यांनी योग्य तो प्रतिसाद दिला आणि त्यानंतर सुमारे चार ते पाच शनिवार त्यांनी पूर्ण दिवसाचे सायबर विषयक सेमिनार त्यांच्या कंपनीचे मार्फत आम्हाला उपलब्ध करून दिले. यातून आम्ही बरेच काही शिकलो. ज्याप्रमाणे तक्रारदारांनी तसेच विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी आम्हाला सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यास मदत केली, त्याचप्रमाणे विविध गुन्ह्यांमध्ये आम्ही जे आरोपी अटक केले त्यांच्याकडून त्यांनी हे गुन्हे कसे केले, हे गुन्हे कसे केले जातात आणि शक्य असेल तर हे गुन्हे कसे उघडकीस आणायचे याबद्दलही त्यांच्या तपासात माहिती करून घेतली. हे माझे सांगणे थोडे धारिष्ट्याचे आहे, परंतु ज्ञान संपादन करण्याकरिता कोणतीही आडकाठी अथवा कोणतीही **inhibitions** न ठेवल्यामुळे आमचे त्याविषयीच्या ज्ञानात खूपच भर पडत गेली. माझे सायबर पोलीस ठाणे येथील सहकारी पोलीस निरिक्षक श्री. नंदकिशोर मोरे, श्री. सुनिल घोसाळकर, श्री. सुभाष जाधव, श्री. शिलवटे, श्री. प्रकाश वारके, श्री. मुतडक, श्री. शिकलकर, श्री. पाटील, श्री. पिंगट, श्री. चिले, श्री. सागरे, श्रीमती विचारे, श्रीमती पाटील तसेच अन्य सहकारी यांनी हे पोलीस ठाणे यशस्वीपणे उभे करायचे आणि चालवायचे हे आव्हान स्वीकारून, स्वतःला या पोलीस ठाण्याच्या निर्मितीत अक्षरशः झोकून दिले. आम्ही, वरिष्ठ पोलीस निरिक्षक ते अंमलदार, असे विविध पदांवरील पोलीस अधिकारी तेथे कार्यरत होतो, परंतु कोणीही आपापल्या पदातील भेदभाव विचारात न घेता, एकजुटीने या कार्याला वाहून घेतले आणि सायबर पोलीस ठाण्याच्या यशस्वी वाटचालीला सुरुवात झाली.

मी वरील नमूद केलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे आणि आम्हाला मदत करणाऱ्या सर्व नागरिकांचे या निमित्ताने आभार मानत आहे.

## कपि तो उडाला

(पान ६ वरुन पुढे चालू)

कारण दृष्टिसमोर लक्ष्य स्पष्ट होतं. आपल्या जीवनात अनेकदा मोहाचे क्षण येतात. पण आपलं आचरण सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून असेल तर आणि तरच लक्ष्य प्राप्ती होते. अशोक वाटिकेत दुःखी सीतामाता दिसल्यावर त्यांना अतिशय आनंद झाला. पण ते अचानक तिच्या समोर आले नाहीत. अशाने ती घाबरून गेली असती. थोडा संयम पाळला आणि परिस्थितीचा अंदाज घेतला. अगदी गोड शब्दात प्रभू रामचंद्रांचा महिमा वर्णून त्यांनी आपल्या येण्याचे प्रयोजन सीतामातेला सांगितले. महारुद्रावतार असून सुद्धा मी श्रीरामांच्या सैन्यातला एक साधारण सैनिक आहे अशी आपली ओळख करून दिली. पहिल्याच भेटीत स्वतःबद्दल वल्गना न करता प्रेमाने समोरच्या व्यक्तीला जिंकायचा विचार मारुतीरायाने केला. दांभिकपणापेक्षा आपले सद्गुण आपल्याला मोठं करतात, हेच खरं.

विशाल लंकानगरीत सीतामातेला शोधताना, देवघर असलेल्या घरात राहणारे बिभीषण त्यांना दिसले आणि विष्णू भक्त असल्याचे जाणून घेऊन, त्यांना आपण श्रीरामाचे दूत असल्याचे सांगितले. वासनांचं प्रतीक असलेली सुवर्णलंका जाळताना बिभिषणांच्या घराला त्याची झळ लागणार नाही याची त्यांनी काळजी घेतली. आपल्या जीवन प्रवासात माणसं ओळखून संबंध प्रस्तापित करण्याचा विचार मारुतीरायांनी मांडला. मारुतीरायांनी लंकेला जाऊन परत येईपर्यंत कुठलाही विचार अस्थिर बुद्धीने केला नाही. ज्यांच्या आदेशाचे पालन आपण करत आहोत तेच कार्य सिद्धीसाठी आपल्याला शक्ती देतील असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे कुठल्याही प्रसंगी त्यांच्या मनात कुठलाही संशय आला नव्हता. आपल्या इच्छा मागे सारून त्यांनी रघुरायांच्या चरणी सर्वस्व अर्पण केले. भक्त किंवा साधक हा निःशंक आणि निरपेक्ष असावा असाच विचार मारुतीरायांनी मांडला. म्हणूनच सर्व प्रकारच्या त्रासातून मुक्तता होण्यासाठी, समर्थ रामदास स्वामींनी भक्तांच्या हाकेला मनाच्या वेगाने धावून येणाऱ्या मारुतीरायाची उपासना करायला सांगितली आहे. ज्याप्रमाणे सीतामातेला शोधताना आलेल्या प्रत्येक संकटावर मात करत मारुतीरायांनी 'रामकाज' पूर्ण केलं, त्याचप्रमाणे आपण आपल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी त्या मारुतीरायालाच प्रार्थना करूया -

'बुद्धी हीन तनु जनिके। सुमिरौ पावन कुमार। बल बुद्धी विद्या देहू मोही। हरहु कलेस विकार॥'

## नोबेल पुरस्कार

जनुकीय आराखड्यात बदल करणाऱ्या (जीनोम एडिटिंग) पद्धतीच्या विकासासाठी जर्मनीच्या 'मॅक्स प्लॅन्क इन्स्टिट्यूट'च्या इमॅन्युएल शारपेंटियर आणि अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या जेनिफर डाउडना या महिला शास्त्रज्ञांना २०२० चे रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक जाहीर झाले. क्रिस्पर/कॅस-९ या जनुकीय विभाजकाचा (जेनेटिक सायसर) शोध दोघी शास्त्रज्ञांनी लावला असून या नव्या तंत्रामुळे वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीवांच्या डी.एन.ए.मध्ये अचूकपणे आणि अपेक्षित बदल करणे शक्य झाले आहे. 'रॉयल स्विडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेस'ने या पारितोषिकाची घोषणा केली. या तंत्रज्ञानाचा उपयोग कमी पावसाच्या भागात वाढतील अशी पिके विकसित करण्यासाठी व कर्करोगावरील उपचारासाठी तसेच अनुवंशिक रोगांवरील उपचारांसाठी करण्यात येत आहे.

लेखांक : भाग ३ व ४

# एक साहस योग - लेह - लडाख

सौ. नेहा किरण सातर्डेकर (भिडे)
मो. ९००४०७८४३३, पुणे

तिसरा दिवस उजाडला तोच मुळी एका वेगळ्या उत्कंठेने. आज आम्ही खारदूंगला पास या जगातल्या सगळ्यात जास्त उंचीवरच्या motorable road ने Nubra Valley येथे जाणार होतो. आदल्या रात्री न विसरता सगळ्यांनी डायमोक्स घेतली आणि दुसऱ्या दिवशीसाठी फिट राहण्यासाठीची काळजी घेतली. लेहपासून सगळ्यात जवळचं destination म्हणजे खारदूंगला पास, जे अवघ्या ४० कि.मी. अंतरावर आहे. म्हणजे निव्वळ एक दीड तासात आपण साडेअकरा हजार फुटांवरून १८३०० फुटांवर पोचतो. जसजसे वर चढत होतो तसतसे खालचे टुमदार लेह, भोवतीची हिरवळ खूपच सुंदर दिसत होती. जवळपास १२ कि.मी.चा घाटरस्ता अगदी सुंदर होता पण त्यानंतरचा रस्ता अगदी खडबडीत होता. लेह कारगिल द्रास हा रस्ता जसा Boarder Road Organisation च्या कृपेने जबरदस्त होता तसा हा सुद्धा BRO नी चांगला बांधला होता. पण वरती होणारी बर्फवृष्टी, उन्हाळ्यात त्याच बर्फाचं वितळून होणारं पाणी, एकीकडे दरी आणि एकीकडे बर्फाची भिंत आणि त्या भिंतीवरून घसरत येणारी माती, बर्फ आणि पाणी यामुळे हा रस्ता कितीही चांगला बनवला तरीही वारंवार त्याची धूप होत होती आणि म्हणून तो असा ओबडधोबड होत असे. त्यात खारदूंगला पासला जाणारी वाढती वर्दळ यामुळे सुद्धा रस्ता खराब होत असावा. आमच्या गाडीचा चालक अतिशय चलाखीने आणि शिताफीने गाडी हाकणारा होता. खडबडीत रस्त्यामुळे गाडीत बसलेलो असताना पण स्वतःचा तोल सांभाळणं कठीण जात होतं. त्या मी रस्त्याचा व्हिडिओ आणि डावीकडे दिसणाऱ्या बर्फाने वेढलेल्या दरीचे फोटो काढण्याचा कसाबसा प्रयत्न करत होते. एकिकडे एक्साईटमेंट, दुसरीकडे स्वतःला मोजे, कानटोपी, स्कार्फ या थंडीपासून बचाव करणाऱ्या कपड्यांनी कव्हर करायची धडपड आणि सारखं 'पाणी प्या रे सगळ्यांनी' चा पुकारा अशी सगळी कसरत सुरू होती. त्यातच वर पोचल्यावर त्रास होऊ नये म्हणून गळ्यात कापराच्या वड्या घातलेल्या पिशव्या आम्ही कपड्यांच्या आत कोंबत होतो. एकीकडे हिमाच्छादित दऱ्या, दुसरीकडे बर्फाचे डोंगर आणि मधल्या खडबडीत रस्त्यांवर चालणाऱ्या गाड्या. आमची नजर ठरत नव्हती इतका सुंदर नजारा, नक्की बघावे कुठे हा प्रश्न पडत होता. मजल दरमजल करीत गाडी वर चढत होती आणि एकीकडे आमची उत्सुकता शिगेला पोचली होती. South Pullu हा खारदूंगला च्या आधीचा Check Post Point इथे आम्ही Bio-Break थांबलो आणि क्षणात तिथे बर्फवृष्टी सुरू झाली. कितीही थांबायची इच्छा होत असली तरीही थंडी भरून येऊ नये म्हणून आम्ही लगेच स्वतःला गाडीत कोंबत पुढे निघालो. 'अब दिल थाम के बैठिये जनाब...' अशी अस्फुट आरोळी ऐकू यावी जणू आणि आम्ही काही मिनिटांत खारदूंगलाला पोचलो. Peak वर पोहोचताना चक्क ट्रॅफिक लागलं ना राव. आम्ही अचंबित ! अरे काय हे इथेही ट्रॅफीकची अशी अवस्था आमची. त्यादिवशी खूप गाड्या असल्याने, आणि बर्फात जपून रस्ता काढावा लागत असल्याने वाहने सावकाश जात होती. आम्ही पटापट उतरलो आणि Boarder Road Organisation ने लावलेल्या दगडाकडे ज्यावर 'Welcome you to the top of the world Mighty Khardungla Height 18379 Feet' अशी नोंद केलेली आहे त्या ठिकाणी फोटो काढायची लगबग करू लागलो. तिथे तर अक्षरशः फोटो काढायला झुंबड उडाली होती. जो तो सेल्फी, ग्रुप फोटो काढून 'आम्ही इथे पोचलो बरं का' हे जणू अख्ख्या जगाला सांगायच्या गडबडीत होता. अशातच आम्ही सुद्धा जागा मिळवून एक दोन ग्रुप फोटो काढायला सांगितले आणि मग लक्षात आले की आजूबाजूचे काही लोक आमच्या ग्रुपमध्ये सामील होऊन फोटो काढून घेत होते. क्षणभर गंमत वाटली आणि वाटून गेलं की 'इथे उभे आहोत तर घेऊ फोटो काढून, कोणत्याही ग्रुप सोबत का असेना - फोटो तर निघाला असा विचार' करून ही मंडळी त्या पिवळ्या दगडाजवळची जागा सोडत नव्हती. मग आम्ही ती जागा रिकामी करून बाजूला असलेल्या जागेत बर्फाचे गोळे हातात घेऊन, फेकून, वाकून, बसून अशा सगळ्या पोझेसमध्ये भराभर फोटो काढून घेतले. (आमच्यातली २ यंग कारटून्स ज्यांना फेबु, कायप्पा आणि इन्स्टावर डीपी टाकण्यासाठी हे उद्योग करायचे होते) सकाळी थोडा पाऊस पडून गेल्याने गारठा अजून वाढला होता, ढग दाटून मळभ आले होते म्हणून एका हॉटेलमध्ये जाऊन आम्ही गरम चहा, कहावा घेतला पण हॉटेलच्या २ छोट्या पायऱ्या चढून पण दम लागत होता. खारदूंगलाला जास्तीत जास्त १५-२० मिनिटे थांबायची परवानगी असते म्हणजे तशी सूचना सगळ्यांकडून केली जाते कारण जर जास्त वेळ थांबलो तर High Alititude चा त्रास होऊ शकतो आणि नाही म्हटलं तरी आमचा तब्बल अर्धा तास गेला होता, आम्ही कापराच्या वड्या हुंगत स्वतःला रिलिफ द्यायचा प्रयत्न करत होतो. आतमध्ये थर्मल, वर कपडे, त्यावर जॅकेट, त्यावर मफलर किंवा स्कार्फ, कानटोपी, कानात बोळे, हॅण्डग्लोव्हज् असा सगळा जामानिमा असून पण पूर्ण बर्फात असल्याने थंडी वाजत होती आणि हवा विरळ असल्याने दम लागत होता. अर्ध्या तासात Peak वरून खाली खारदूंगला गावाकडे निघालो. माझ्या एका बहिणीला श्वास घ्यायला थोडा त्रास होऊ लागला. आम्ही precaution म्हणून ऑक्सिजन सिलेंडर गाडीत कॅरी केला होता. तो तिला लावला म्हणजे थोडा रिलिफ मिळेल. खाली उतरताना पुन्हा घाटात ट्रॅफिक लागलं. BRO वाले बर्फ हटवून रस्ता मोकळा करायचं काम करत असल्याने JCB आणि त्या वाहनांमुळे थोडं ट्रॅफिक झालं होतं. इतक्या अरुंद रस्त्यात समोरून गाडी आली असताना आपली गाडी काढणं हे एका कसलेल्या ड्रायव्हरचंच काम असू शकतं. आम्ही जीव मुठीत घेऊन तो रस्ता पार करून खाली जायची वाट बघत होतो. जराजरी लक्ष हटलं, बर्फाच्या पाण्यावरून गाडीची चाकं घसरली तर डायरेक्ट दरीत गच्छंती. आम्ही North Pullu कडे पोचलो आणि चेक पोस्ट वर चेक आऊट केलं. ती हिमाच्छादित शिखरं जणू पांढरी दुलई पांघरून गपगार पहुडली होती. चहूबाजूला फक्त बर्फ आणि बर्फच. आम्हाला Natural Freezer मध्ये बसल्यासारखे वाटत होते. तेवढ्यात मळभ दूर होऊन लखख ऊन पडलं, सूर्यप्रकाशात सगळे डोंगर न्हाऊन निघाले जणू, आणि ते पांढरं सोनं चमचम करू लागलं. ती अपूर्व नवलाई बघता बघताच घाट

रस्ता उतरून आम्ही कधी खाली आलो ते कळलंच नाही. उजवीकडे मस्त झरा वाहत होता, हवेत चांगलाच गारवा, एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचं समाधान वाटत होतं. तेवढ्यात माझ्या त्या बहिणीला उलट्या होऊ लागल्या, आम्ही म्हटलं घाटवळणाचा त्रास असेल किंवा High Alititude चा. आवळासुपारी, आलेपाक असं देऊन तिला थोडा आराम करायला सांगितलं. तोवर आम्ही खारदूंग गावात लंच ब्रेकसाठी पोचलो होतो. एक साधसं हॉटेल होतं आणि एक चुणचुणीत शिकलेली मुलगी सगळी ऑर्डर घ्यायला आली. तिच्या बोलण्यावरून आणि पेहरावावरून ती चांगली शिकलेली दिसत होती पण हे काम करायला तिला जराही कमीपणा वाटत नव्हता. सूप, मोमोज्, मॅगी आणि ब्रेड ऑम्लेटची ऑर्डर दिली. मोमो म्हणजे आमल्या कणकेच्या पिठात भाजी भरून उकडलेली करंजी होती जणू. मोमोजूचा आकार मोदकांसारखा असतो पण इथे तर चक्क करंजी होती. आमच्या ड्रायव्हरने त्या हॉटेलमधून बहिणीला आवर्जून लेमन टी आणून दिला ज्यामुळे तिला थोडं बरं वाटेल, तोंडाला चव येईल. सिझनमध्ये आमच्यासारखे अनेक टुरिस्ट घेऊन येत असल्याने त्यांना असे अनुभव नवीन नव्हते. त्यामुळे कुठे काय मिळते आणि एखाद्याला त्रास झाल्यास काय उपचार करून, काय खायला प्यायला देऊन आराम देता येईल याचं अनुभवाने आलेलं शहाणपण त्यांच्याकडे नक्कीच होतं. गंमत म्हणजे आमचा ड्रायव्हर सिरिंग एवढा सहृदयी माणूस होता की जिथे कुठे आम्ही लंचला छोट्या हॉटेलला थांबत असू तिथे तो स्वतः मदत करायला जायचा. कुठे पाणी आणून दे, ऑर्डर घे, तिथे असलेल्या इतर लोकांना मदत कर असं सगळं तो करत होता. त्याने बॉटल भरून लेमन टी बहिणीसाठी घेऊन ठेवला, प्रवास करताना सोबत असावं म्हणून. इतक्या छोट्या छोट्या गोष्टींची तो काळजी घेत असे आणि सोबत त्याचा मित्र म्हणजे हांचुक सुद्धा आम्हाला खूप मदत करत होता. आम्ही एकेक डोंगर पार करत होतो. पुढचा मुक्काम Nubra Valley मध्ये होता. आमच्या मागे पुढे Bikers चे तांडे होते. इथे Bike वरून Adventure ride, cycling करायला अनेक Foreigners येत असतात आणि गेल्या काही वर्षांत भारतात सुद्धा हा ट्रेंड सेट झालाय. Bike ride वर अख्खा लेह लडाख पालथा घालण्यात वेगळंच थ्रील असेल नाही ! डोंगर दऱ्यांतून वाऱ्यावर स्वार होऊन मोकळ्या आभाळाखाली बिनधास्त, मनसोक्त हुंदडताना काय सॉलिड मज्जा येत असेल असं सारखं मला त्या Bikers ना बघून वाटत होतं. Nubra Valley हे High Alititude मधलं cold desert आहे, जिथे पाऊस अत्यंत कमी आणि हिरवाई सुद्धा कमी आहे. पांढरी भुसभुशीत वाळू, शायोक नदीचं पात्र चहुबाजूंनी डोंगराने वेढलेलं, विस्तीर्ण पसरलेलं वाळवंट. इथे दुबईसारखी quad biking करता येईल अशी स्कूटर किंवा गाडी असते. ATV ride म्हणजे All Terrain Vehicle म्हणतात या वाहनाला, जी वाळूवर चालवता येते, Engine, Break, accelerator असतात. २ जण बसून चालवू शकतात, शिवाय मदतीला त्यांचा माणूस देखील असतो. ही एक वेगळीच गंमत ride आहे, आम्ही सगळ्यांनी १५ मिनिटे ही ride घेतली आणि पुढे निघालो. पुढे विस्तीर्ण पसरलेल्या वाळवंटात खूप गर्दी होती. शायोक नदीच्या छोट्या पात्रात पाय घालून काही मंडळी बसली होती, त्यावर छोटे साकव म्हणजे लाकडी पूल घातले होते. इथे double hump camel ride म्हणजे २ कुबड असलेल्या उंटावरची सफारी होती. एका उंटाच्या मानेतल्या पट्ट्याला दुसऱ्या उंटाचा पट्टा असे एकामागोमाग एक ५ उंट बांधून एक छोटी राऊंड मारायची. आम्ही सगळेजण हौसेने बसलो खरे पण आमच्यातल्या २ उंटीणींच्या पिल्लांनी आईचे दूध पिण्यासाठी आम्ही बसलेल्या उंटीणींना त्रास द्यायला सुरुवात केली. त्यामुळे त्या उंटीणींनी थरथराट करून अंग झटकायला सुरुवात केली. झालं, आमची भीतीने भंबेरी उडाली आणि एकीकडे हसून हसून पुरेवाट. आम्ही जरा आरडाओरडा केला की ते उंट अजून बिथरायचे, उंटाच्या पाठीवरचे शहाणे हलत डुलत शेवटी एकदाचे पोचले आणि उंटांनी बसकण मारली. उंटावर बसताना आणि उतरताना उंटांची जी काही खाली वर हालचाल होते आणि आपल्याला एक धक्का बसतो तो अनुभवण्यात थ्रीलच वाटले, तोल जाऊन आपण पडलो तर ? अशी भीती आपल्याला, पण उंट बिचारे आपली ओझी वाहून दमून थकून गेलेले दिसतात. त्या मुक्या प्राण्यांची दया आली आणि आपण आपल्या हौसेसाठी त्यांना वेठीला धरतो असा उगाच एक अपराधी विचार डोकावला. Nubra Valley मधले हे so called adventures होईपर्यंत बहिणीची तब्येत जास्त बिघडली होती. आमच्याकडची औषधं गोळ्या देऊन सुद्धा उलट्या काही थांबत नव्हत्या. आम्ही गावात चौकशी केली की medical emergency आहे तेव्हा इथे काही वैद्यकीय उपचार मिळू शकतील का ? तेव्हा कळलं, Nubra येथील हुंडर या गावात जिथे आमचा मुक्काम होता तिथे मिलिटरी हॉस्पिटल आहे. आमच्या Nubra Sarai इथल्या तंबूत मुक्काम ठोकून, बॅगा वगैरे ठेवून बाकी मंडळींना सेटल करून आम्ही थेट मिलिटरी हॉस्पिटल गाठलं. आमचा चालक आणि वाहक दोघेही दमले होते पण तरीही आम्हाला हॉस्पिटलपर्यंत घेऊन गेले. Indian Military चं हॉस्पिटल जिथे accident आणि emergency ward आहे तिथे आम्ही तिला घेऊन गेलो. तिथल्या डॉक्टर्सनी तत्परतेने तिचं बीपी, ऑक्सिजन लेव्हल, ताप असं सगळं चेक केलं. पहिला प्रश्न त्यांनी विचारला तो म्हणजे तुम्ही किती वेळ खारदूंगलाला थांबले होतात आणि दुसरा प्रश्न हा की पाणी किती प्यायलंय ? त्यांच्या सांगण्यानुसार कमीत कमी ५-६ लिटर पाणी पिणं आवश्यक असतं. या दोन गोष्टींवर आपली तब्येत बिघडण्याची शक्यता अवलंबून असते. आम्ही जवळपास अर्धा तास म्हणजे थोडं जास्त वेळ थांबलो असं त्यांना वाटलं असावं, पाणी सुद्धा म्हणावं तेवढं प्यायलं गेलं नव्हतं. सुदैवाने तिची ऑक्सिजन लेव्हल maintain होती पण तिला थंडी भरून ताप चढत होता आणि उलट्या होऊन पाणी कमी प्यायलं गेल्यानं de-hydration झालं होतं. त्यांनी तिकडच्या इनचार्ज असलेल्या सिनिअर डॉक्टरला रिपोर्टींग केलं आणि लगेच बोलावून घेतलं. त्यांनी तपासून तिला एक इंजेक्शन आणि एक गोळी दिली आणि पडून राहायला सांगितलं. जवळपास २ तास तिला तिथे ॲडमिट करून आम्ही त्या मेडिकल ऑफिसरबरोबर बोलत बसलो होतो. त्यांचं युनिट म्हणे ३ महिने सियाचीन ड्युटीवर असतं आणि साधारण २ वर्षे त्यांचं पोस्टींग High Alititude region मध्ये असतं. हे सगळं युनिट टर्न बाय टर्न सियाचीनला जाऊन तेथल्या आपल्या जवानांच्या तब्येतीची काळजी घेतात, उपचार करतात, हे सगळं करताना त्यांना स्वतःला त्यांची तब्येत फिट ठेवावी लागते.

High Alititude ला पोस्टींग झालं की त्यांना तिथे राहायला आवश्यक असलेलं ट्रेनिंग दिलं जातं आणि सियाचीन ड्युटी वर २१ दिवसांचं ट्रेनिंग असतं. तिथल्या हवामानाशी जुळवून घेताना काय काळजी घ्यायची, कसं हळूहळू स्वतःला तयार करायचं, प्रथमोपचार काय करायचे, emergency आली तर काय दक्षता घ्यायची असं सगळं ट्रेनिंग दिलं जातं. आम्ही तिथे असतानाच त्या हॉस्पिटलला तीनएक पेशंट आले, सगळे आमच्यासारखे टुरिस्टच होते. एक ७ वर्षांचा मुलगा, एक ५० चे काका असे सगळे काही ना काही त्रास होतोय म्हणून आलेले होते. इथे राहणाऱ्या लोकांपेक्षा आमच्यासारखे टुरिस्टच त्यांच्या casualty मध्ये सारखे येत असतात हे त्यांच्याकडून कळलं आणि या सगळ्या रुग्णांची सेवा, उपचार ते अगदी तत्परतेने आणि विनामोबदला (कर्तव्य भावनेने) करत असतात. हे जाणवून पुन्हा एकदा त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला. स्वतःच्या घरापासून, माणसांपासून दूर High Alititude मध्ये राहून देशसेवा करत असताना, सामान्य लोकांसाठी जबाबदारीचे, कर्तव्याचे भान राखून माणुसकीने त्यांची मदत करणारे आपले जवान खरोखर ग्रेट आहेत. माझ्या बहिणीला थोडं बरं वाटू लागलं तेव्हा त्यांनी सिनिअर डॉक्टरला पुन्हा रिपोर्टींग केलं आणि त्यांची परवानगी घेऊनच आम्हाला जायची परवानगी मिळाली. आम्ही त्यांचे मनापासून पुन्हा पुन्हा आभार मानले. तत्परतेने योग्य उपचार मिळवून दिल्यामुळे कृतज्ञता व्यक्त केली आणि नंतर परत आमच्या तंबूकडे आलो. एवढा वेळ बाहेर वाढलेल्या थंडीत गाडीत वाट बघणारा आमचा ड्रायव्हर दमून झोपी गेला होता पण त्याचा मित्र म्हणजे आमचा वाहक हांचुक हा किमान ४ वेळा हॉस्पिटलच्या आत मध्ये येऊन बहिणीच्या तब्येतीची विचारपूस करत होता. आम्हाला खरंच खूप कौतुक वाटलं त्यांच्या या आपुलकीने काळजी घेणाऱ्या स्वभावाचं, माणुसकीचं. आम्ही त्यांचे सुद्धा मनःपूर्वक आभार मानले. देशभरातून, विदेशातून येणारे कोण कुठले टुरिस्ट, त्यांच्यासाठी आमल्या माणसासारखं सगळं करताना यांच्या मनात नक्की कोणते भाव असतील ? कोणत्या शाळेत ही एवढी माणुसकी, आस्था, आपुलकी, सद्भावना हे लोक शिकले असतील असा विचार अंतर्मुख करून गेला. याच आपुलकीचा लगेचच अजून एक अनुभव आला. नॉर्मल जेवणाच्या वेळेनुसार आम्ही जिथे राहणार होतो तिथलं डायनिंग ९.३० ला बंद होणार होतं. हे आम्हाला हॉस्पिटलला गेल्यावर कळलं होतं. तेव्हा आम्ही आमच्या डायव्हरला तिथे निरोप द्यायला सांगितलं की आम्हाला हॉस्पिटलमधून यायला उशीर होतोय. तर आमची ताटं वाढून आमच्या तंबूत ठेवून द्या. आम्ही आल्यावर जेवू. आम्ही आमच्या टेंटमध्ये परतलो तेव्हा रात्रीचे साधारण १०.३० वाजले होते. बहिणीला औषधं देऊन झोपायला सांगून आम्हाला मिळालेल्या निरोपानुसार डायनिंगहॉलमध्ये गेलो. बघतो तर काय तिथला सगळा स्टाफ आमच्या दोघांसाठी त्यांचं किचन बंद न करता स्वतः न जेवता सगळा बुफे डिनर तसाच शेगडीवर गरम करत ठेवून आमची वाट बघत बसला होता. आम्ही गेल्या गेल्या त्यांनी आम्हाला आपुलकीने गरम गरम जेवण वाढलं. दिवसभर प्रवास आणि हॉस्पिटलची गडबड याने दमून गेल्यामुळे फारशी भूक राहिली नव्हती तरीही पुन्हा पुन्हा काय काय मेनू आहे आणि काय डिश चांगली आहे, नक्की खाऊन बघा, थोडीतरी खा असा प्रेमळ सल्ला देऊन अगदी आग्रह करून जेवायला घातलं. जेवण इतकं चविष्ट होतं की आमचं पोट तर भरलंच पण त्यांच्या आपुलकीने, आस्थेने मन सुद्धा तुडुंब भरून गेलं. एवढं आदरातिथ्य, Hospitalily हे लोक कोणत्या management school मध्ये शिकून आले असतील असा एक विचार पुन्हा एकदा स्पर्शून गेला.

Nubra Valley मधले आमचे तंबू एकदम अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज होते. एक गोलाकार कापडी तंबू, लाकडी पर मजबूत ceiling, आतमध्ये लाकडी बेड, सार्टड टेबल, सेंटर टेबल, उच्चप्रतीचे बांधकाम असलेले Tilling केलेले Toilet Bathroom, आतमध्ये गरम पाणी, सगळ्या accessories असा अद्ययावत सोयींनी परिपूर्ण असा तंबू होता. इथल्या थंडीशी जुळवून घेण्यासाठी थंडीत चांगली ऊब मिळण्यासाठी पातळ छोट्या गाद्या आणि जाडसर रग पांघरायला अशी उत्तम व्यवस्था तंबूत उपलब्ध होती. एकूणच अतिदुर्गम असलेल्या या भागात लाईट, पाणी यांची मुबलकता जरा दुर्मिळ आहे. त्यामुळे रात्री ११ वाजता स्थानिक प्रशासनाकडून इथले लाईट बंद केले जातात. म्हणून १०.३० ला येऊन जेवून आम्ही लगेचच आमच्या तंबूत येऊन बसलो. कारण बाहेर मिट्ट काळोख आणि रात्र वाढत जाईल तसा बाहेर वाढणारा गारठा यामुळे बाहेर यायची हिम्मत नव्हती. त्यादिवशी जरा जास्तच थकल्याने गाढ झोप लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी अगदी गरमागरम उपमा, पराठा, पुरीभाजी असा चविष्ट नाश्ता करून आम्ही Nubra Valley चा निरोप घेतला. तिथून जवळपास ७७ किमी. वर तुर्तुक हे भारत-पाक बॉर्डरवरचं शेवटचं गाव आहे जे अतिशय सुंदर, नयनरम्य आहे असं ऐकून आम्ही ते Itinerary मध्ये include केलं होतं. पण आदल्यादिवशी बहिणीची तब्येत बिघडल्यामुळे आम्ही तिथे जायचा बेत रद्द केला. तशी तिची तब्येत थोडी बरी होती पण आम्ही म्हटलं अजून प्रवास करून रिस्क घ्यायला नको. म्हणून पुन्हा लेहच्या दिशेने परतीच्या प्रवासाला लागलो. आम्ही आतापर्यंत लेहच्या हवामानाला, वातावरणाला चांगले ॲडजस्ट झालो होतो. म्हणून लेहला म्हणजे जणू घरच्यासारख्या सेफ वाटणाऱ्या मुक्कामी अर्थात The Kaal मध्ये परत जायचा निर्णय घेतला. जाताना आम्हाला डिस्कीट मॉनेस्ट्री ही एका उंच टेकडीवर असलेली Monestry बघता आली. तिथे अगदी भव्य अशी बुद्धमूर्ती आहे आणि त्या उंच टेकडीवरून Nubra Valley चा सगळा परिसर अगदी देखणा दिसतो. नेहमीप्रमाणेच या Monestry मध्ये ७ पाण्याचे पाऊल बघितले आणि तिथल्या लामांकडून म्हणजे (गुरुजींकडून) साखरफुटाण्याचा प्रसाद सुद्धा घेतला. नेमका त्याच दिवशी म्हणजे ६ जुलैला तिबेटियन धर्मगुरू दलाई लामा यांचा वाढदिवस असल्याने सगळीकडे उत्सव आणि जत्रा भरलेल्या होत्या अशी माहिती त्या लामांनी आम्हाला दिली. जाताना पुन्हा एकदा खारदूंगला पासचे दर्शन घेतले, आज स्वच्छ सूर्यप्रकाश आणि चकाकणारं ऊन पडलं होतं आणि चक्क आजीबात गर्दी नव्हती. म्हणून पुन्हा एक १० मिनिटे थांबून फोटोची हौस भागवून घेतली. आम्ही इथल्या प्रवासात जिथे जिथे आर्मीचे जवान दिसतील, जिथे चेक पोस्ट असेल तिथे वाटायला भरपूर खाऊ सोबत घेतला होता. इथे खारदूंगला टॉपला असलेल्या चेक पोस्टवर आवर्जून खाऊ देऊन आलो. तिथल्या सैनिकांना खूप कौतुक वाटलं. त्यांनी मनापासून आभार मानले आणि थोड्या गप्पा मारल्या. थंडीत -४०/-५० degree tempeture मध्ये ते लोक इथं एवढ्या उंचावर कसे राहतात ते

ऐकून अक्षरशः काटा आला. आपण कल्पनाही करू शकणार नाही अशा खडतर परिस्थितीत राहण्याची मानसिक आणि शारीरिक तयारी असलेले आपले जवान खरंच वंदनीय आहेत ते पुन्हा जाणवून गेलं. त्यादिवशी आम्ही लेहला लवकर पोचल्याने संध्याकाळी शांती स्तूप (बुद्धमंदिर) आणि लेह मार्केटला भेट दिली. शांती स्तूप हे असंच एक धार्मिक स्थळ जे खूप उंचावर आहे आणि तिथून संपूर्ण लेहचा परिसर, भोवतीचे डोंगर ज्यामध्ये स्टोक कांग्री हे महत्त्वाचं शिखर दिसतं. लेह मार्केटला खूप सुंदर स्थानिक पद्धतीचे दागिने, ॲक्सेसरीज, पश्मिना शाली, स्वेटर, जॅकेट्स, sovenier shoes, शोभेच्या वस्तू, key chains, prayer flags, wind chimes आणि dry fruits असं खूप काही मिळतं. ड्रायफ्रुटच्या दुकानात इथे ॲप्रिकॉट ऑइल, जूस आणि ॲप्रिकॉट लीप बाम अशा काही इथली खास वैशिष्ट्ये असलेल्या गोष्टी आम्ही घेतल्या. शिवाय दागिने, की चेन्स, prayer flags अशी सगळी खरेदी करून आमचे खिसे रिकामे करून हॉटेलला परतलो. (क्रमशः)

---

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

## जानेवारी ते सप्टेंबर २०२० देणगीदारांची यादी

| | | रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विद्याधर शंकर भिडे, डोंबिवली | ५,००,००० | देणगी |
| २. | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | ३,००,००० | वैद्यकीय निधी |
| ३. | श्री. रत्नाकर दत्तात्रय भिडे, पनवेल | ५०,००० | देणगी |
| ४. | श्री. मिलींद दिगंबर भिडे, छत्तिसगड | १०,००० | विवाह मदत देणगी |
| ५. | श्री. चंद्रशेखर श्रीधर भिडे, बोरिवली | १०,००० | आम्ही भिडे देणगी |
| ६. | श्री. मिलींद दिगंबर भिडे, छत्तिसगड | १०,००० | वैद्यकीय निधी |
| ७. | श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल | ५,००० | देणगी |
| ८. | श्री. अतुल पद्माकर भिडे, पनवेल | ५,००० | देणगी |
| ९. | श्री. अमित रत्नकुमार भिडे, पनवेल | ५,००० | देणगी |
| १०. | श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे | ५,००० | देणगी |
| ११. | श्री. प्रसन्न भास्कर भिडे, कांजुरमार्ग, मुंबई | २,००० | देणगी |
| १२. | सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, तळेगाव दाभाडे | १,००० | देणगी |
| १३. | श्री. श्रीपाद श्रीकांत भिडे, तळेगाव दाभाडे | १,००० | देणगी |
| १४. | श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली | १,००० | देणगी |
| १५. | श्रीमती शैलजा राजाराम भिडे, अलिबाग | १,००० | देणगी |
| १६. | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | १,००० | देणगी |
| १७. | श्री. शरच्चंद्र विनायक भिडे, मुंबई | १,००० | वैद्यकीय निधी |
| १८. | श्री. श्रीधर विनायक भिडे, बोरिवली | १,००० | वैद्यकीय निधी |
| १९. | श्री. सुधीर विष्णू भिडे, बदलापूर | १,००० | आजीव सभासद |
| २०. | सौ. अनघा अमित पटवर्धन (भिडे) बदलापूर | १,००० | आजीव सभासद |
| २१. | सौ. स्नेहल दीपक भट (भिडे), गोरेगाव, मुंबई | १,००० | आजीव सभासद |
| २२. | श्री. अमित सुभाष भिडे, मुंबई | १,००० | आजीव सभासद |
| २३. | श्री. महेश मोरेश्वर भिडे, पुणे | १,००० | आजीव सभासद |
| २४. | सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे, मालाड | १,००० | आजीव सभासद |
| २५. | सौ. मासूम श्रेयस भिडे, मालाड | १,००० | आजीव सभासद |
| २६. | सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे, मालाड | ६०० | देणगी |
| २७. | श्री. जयंत सदाशिव पाटणकर, कासे, रत्नागिरी | १०० | देणगी |

## आदिमाया गीत

रुणझुण रुणझुण (२दा) वाजती पैंजण अंबा येई घरा।
रुणझुण रुणझुण (२दा) नादती पैंजण अंबा येई घरा।
(२दा) होऽ अंबा येई घरा॥ध्रु०॥
मखर सजविले देव्हाऱ्यावरी
केली तोरणे महाद्वारी
देव्हाऱ्यामध्ये दुर्गा स्थापिली
नवरात्रीचा हा महोत्सव।
शौर्य शक्तीचा हा तर उत्सव।
शक्तीरुपिणी आदिमाया
दुर्गा येई घरा॥ रुणझुण...॥१॥
अंबाल्याली शालू जरतारी
हिरवी कांकणे हिरवी काचोळी
नवरत्नांचा हार ल्याली
नथ ही लफ्फेदार॥ रुणझुण...॥२॥
हीच शारदा विणावादिनी
आदिमाया कुलस्वामिनी
हीच वैष्णवी अन नारायणी
ललितागौरी, कमलासनी
सुघटा वरती शोभते
झेंडू फुलांची माळ॥ रुणझुण...॥३॥
महालक्ष्मी ही कोल्हापूरची
तुळजाभवानी तुळजापूरची
हीच रेणुका माहूरगडची
अर्धपीठ पर्वतशिखरी सप्तशृंगी देविका
(महिषासूर मर्दिनी)॥ रुणझुण...॥४॥
नवरात्रीच्या ह्या महोत्सवी
नवदुर्गांना नयनीसाठवू
शौर्य गाथा, त्यांची गाऊ
भक्तीभावे पूजिता आपण
देई हीच, सौभाग्याचे वरदान
भाग्याचे वरदान॥ रुणझुण...॥५॥

**– सुमती भिडे, पुणे. ०२०-२५४४११६१**


# तगरी (स्वस्तिक)

पहाटे फिरण्यास जाणे ही माझी अनेक वर्षांची सवय. फिरणे, मित्रांशी गप्पा, चहा अशा अनेक गोष्टी करत घरी अशी सकाळची दिनचर्या. कोरोनामुळे ही दिनचर्या बदलली आणि फिरण्याचे जग माझ्या कॉलनीपुरते सीमित झाले. रोज वेळ मिळेल तेव्हा फिरण्यास निघतो. सकाळ वॉकिंग, संध्याकाळ वॉकिंग, गप्पा आणि रात्री शतपावली. आज पहाटे फिरत असताना गणपती मंदिराजवळील फुलांनी बहरलेल्या तगरीच्या झाडाकडे लक्ष गेले. तगरीचे झाड फार उंच नसते. त्यामुळे त्याची फुले कुणासही काढता येतात. ही फुले बारा महिने मिळतात. तगरीच्या फुलांचा रंग कसा छान शुभ्र. पाच पाकळ्या आणि त्याही एका दिशेने वळलेल्या म्हणून ते स्वस्तिक. (कोकणात यास अनंत असे म्हणतात.) हे सर्व पाहताच मनात कॉलनीतील सर्व फुलझाडे, त्यांचा बहर आणि गेल्या चार महिन्यात नकळत घेतलेला आनंद मनःपटलावर तरळला. मी वनस्पतीशास्त्र विषयाचा प्राध्यापक नेहमी फुलांच्याकडे शास्त्रीय दृष्टीने पाहणारा व **calyx, corolla androecium, gynoecium** या तांत्रिक शब्दात अडकलेला. या लॉकडाऊनमध्ये फुलांकडे पाहण्याची नवीन अनुभूती मिळाली. राहत्या ठिकाणी रस्त्यांच्या कडेला गुलमोहर, बहावा, सोनचाफा, पारिजातक, बुच, सप्तपर्णी, जास्वंद, गुलाब अशी फुलझाडे आहेत आणि मार्चपासून या झाडांच्या फुलांचं उमलणं, बहरणं आणि अगदी कोमेजणं सुद्धा पाहिले. त्यावर फिरणारे विविध कीटक, पक्षी, त्यांचे आवाज आठवू लागले आणि निसर्गाचा विविधरंगी कॅनव्हास डोळ्यांसमोर दिसू लागला. पहाटे फिरण्यास बाहेर पडताच दारातील पारिजातक आपल्या सुवासाने आणि पडलेल्या सड्याने लक्ष वेधून घेतो. या फुलांचे डायरेक्ट कृष्णाशी नाते, त्यामुळे आपोआपच पाय हळूच बाजूने निघतात. तो वास तनमनात साठवून त्याच आनंदात जात असताना, रस्ता जणू फुलांच्या पायघड्यांनी सजून आमच्या स्वागतास सज्ज असतो. गुलमोहराची लाल फुले, बहावाची पिवळी फुले रस्त्यावर पसरलेली असतात. पण लक्ष वेधून घेतात ती बुचाची लांब पांढरी फुले. आपसूकच ती उचलली जातात आणि सहजपणे बरोबर फिरणाऱ्या सौ.च्या हातात विसावतात. ती घेऊन लाल पिवळ्या फुलांमधून चालताना काश्मिरमधील ट्युलिप गार्डन आठवते. यातून फिरताना अमिताभ, रेखा (घरातीलच) फिरल्याचा फिल घेत ... देख एक ख्वाब ... हे गाणे मनात रुंजी घालू लागतं. फिरून घरी परतत असताना वाटेतील बिट्टीच्या फुलांचा झुपका तोडून हातात फिरवत राजेंद्रकुमार स्टाईल घरात एन्ट्री होते. संध्याकाळी बाहेर पडल्यावर सकाळचे पांढऱ्या, पिवळ्या, लाल फुलांचे गालिचे उन्हाने कोमेजून गेलेले असतात. ही क्षणभंगुरता पाहून तिन्हीसांजेला मनास हूरहूर जाणवू लागते आणि हळूच पाय गणपती मंदिराकडे वळतात. देवदर्शन करून निघताना तेथील सोनचाफा लक्ष वेधून घेतो. तेथील एखादे फूल हळुवारपणे हातात येते. देवदर्शन आणि चाफ्याच्या वासाने मन प्रसन्न होते. त्याच मूडमध्ये मित्र परिवाराशी गप्पाटप्पा करत संध्याकाळी सातच्या सुमारास पाय घराकडे वळतात. (जुने संस्कार). रात्रीचे जेवण झाले की शतपावली करत हळूहळू फिरताना कुठल्या तरी कोपऱ्यातून येणारा रातराणीचा धुंद करणारा सुगंध मनास रोमँटिक करून जातो आणि ओठांवर शब्द रेंगाळतात 'रजनीगंधा फूल तुम्हारे...' असाच दिनक्रम चालू असतो आणि एक दिवस रात्री सप्तपर्णीला फुले येतात. ती न दिसता उग्र दर्पाने अस्तित्वाची जाणीव करून देतात आणि हळूच स्वप्नं आणि सत्यातील फरक कळू लागतो. या जाणिवा जागृत होत असताना मनास प्रश्न पडला, मानवी स्वभाव या निसर्गातील फुलांसारखाच असतो का ? काही व्यक्ती पारिजातक, चाफा या फुलांप्रमाणे फार थोडा वेळ सान्निध्यात येतात आणि आपल्या अंगभूत गुणांनी तुमच्यावर छाप सोडून जातात. तर काही गुलाबासारखी हवीहवी वाटणारी पण जवळ आल्यावर टचकन शब्दांनी टोचून डोळ्यांत पाणी आणणारी. चाफा, पारिजातक, जास्वंद या फुलांप्रमाणे काहींना विशेष मान मिळतो. पळस, बहावासारखी सुंदर असूनही त्यांचं अस्तित्व फक्त दिसण्यापुरते मर्यादित राहते. मात्र काही सप्तपर्णीसारखी न दिसता उद्योग करणारी. पण काही गुलमोहरासारखी आपल्या गुणांच्या इगोत रमणारी आणि संकट येताच विखरून जमिनीवर येणारी. काही माणसे मात्र तगरीसारखी असतात. बारा महिने उपलब्ध असणारी, सहज मदतीस येणारी आणि आपल्या स्वच्छ मनाने स्वतः मागे राहून दुसऱ्याचे अस्तित्व ठळक जाणवून देणारी. 'जिथं कमी तिथं आम्ही' या वाक्याप्रमाणे सदा सर्वकाळ कुठलीही अपेक्षा न ठेवता चालत राहतात...

नसेल मजला रंगरूप, नसेल मी सुंगधी खूप, परी मंदिरी असते पूजा स्वरूप !

**– प्रा. जयराम भिडे, सोलापूर.** मो. ८६६८६१२७५२

## ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक



स्वातंत्र्य सैनिक शंकर विष्णू भिडे उर्फ बाबूराव भिडे यांच्या स्मृतिला उजाळा देणे हेच माझ्यासाठी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यदिन साजरा करणं आहे. ते माझे आजोबा. कर्मभूमी सातारा. त्यांचे वडील डॉक्टर व लोकमान्यांचे अनुयायी होते. माझे आजोबा वकील व महात्माजींचे अनुयायी होते. वडिलांच्या निधनाने आई, भावाबहिणींची जबाबदारी व नंतर स्वतःच्या संसाराची जबाबदारी असताना गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीत, स्वातंत्र्यपूर्व भारतातील लाखो स्वातंत्र्य व देशप्रेमींप्रमाणे (आणि इथे मी सामान्य हा शब्दप्रयोग करूच शकत नाही आणि या उलट ज्यांनी त्या भाग घेतला नाही तेच सामान्य) आपल्या संसाराची व नात्यांची होळी केली. त्यात माझे आजोबा सातारचे नेते म्हणून अग्रणी सत्याग्रही होते. मिठाचा सत्याग्रह, जनजागृतीसाठी सातारा जिल्हा व आजूबाजूचा प्रदेश येथे दौरे, भाषणे, वृत्तपत्र चालवणे, शाळेत शिकवणे आणि यासाठी तीनदा तुरुंगवास हे त्यांचे राष्ट्रासाठी स्वदान व त्यांच्या कुटुंबीयांचाही अप्रत्यक्ष सहभाग ! त्यानंतर त्यांनी त्याचा कधीही फायदा घेतला नाही. स्वतःसाठी नाहीच पण कुटुंबीयांकरता पण नाही. कुठल्याही राजकीय व प्रशासकीय पदासाठी सुद्धा घेतला नाही. फक्त दोन पिढ्यांच्या अंतराने आपण फक्त अशा महात्म्यांचे स्मरणच करू शकतो व त्यांच्या निःस्वार्थी, निःस्सीम व निःस्पृहतेने अचंबित होतो.

**– राजेंद्र -चंद्रकांत शंकर विष्णू भिडे,** पुणे.

## दरवळ

बहरून बोलली बागेतली बकुळी।
मला वेचाया यावे सकाळी सकाळी।
माळुनी गजरा मोहक तरुणीला।
मोहुनी मोगरा म्हणाला मजला।
पहाटेचा पारिजात पसरे परिमळ।
पायवाटेला तो सुंदर दरवळ।
अशा फुलांचा सुवास गंधकोशी।
परिमळ दरवळ पसरे या पंचक्रोशी।
नवनाविन्यांनी निसर्ग नटला।
लता वेलींनी फुलून आला॥

**– सौ. शिल्पा भिडे,** मालाड (पू.)

# आमचा आगंतुक (नकोसा) पाहुणा

... त्याचं झालं असं की २० दिवसांपूर्वी घराची बेल वाजली, दारात तो उभा होता. आम्ही नको नको म्हणत असताना थेट घरात शिरला. बरं शिरला तो शिरला पण अगदी प्रत्येकाला येऊन त्याने गळामिठी मारली हो ! आता सोशल डिस्टन्सिंग म्हणताना याला आत्ता घरी तडमडायची काही गरज होती का ? पण नाही, तो विचारून का येतो आपल्याला ? की परवानगी घेतो आपली ? नाहीच मुळी - असे शिष्टाचार तो जराही पाळत नाही आणि एकदा का घरात घुसला की आपल्या अंगाखांद्यावर खेळल्यासारखा चक्क बिलगतो आपल्याला ... अहो कोण म्हणून काय विचारताय ? नाही नाही म्हणता आमच्या घरात नकोसा आगंतुक पाहुणा शिरलाच - त्याला नाव विचारायची गरजच पडली नाही म्हणा - जे काही गुण त्याने उधळायला सुरुवात केली होती त्यावरून कळलंच की हा दुसरा तिसरा कुणी नसून चक्क 'कोरोना' आहे. त्याने मारलेली मिठी इतकी घट्ट होती की 'मिठी के साइड इफेक्टस्' लगेचच दिसायला लागले. कोणाला ताप, कोणाला उलट्या-जुलाब, कोणाला नुसतीच सर्दी, अंगदुखी आणि कोणाला चव, वास लागेना असे त्याचे सगळे प्रताप दिसू लागले आणि आमचे सगळ्यांचेच धाबे दणाणले. अहो आम्ही घरचे सगळे सदस्य चक्क कोविड-१९ पाझिटिव्ह झालो. गेले ४-५ महिने आपण सगळेच एका विचित्र बंधनात अडकलो होतो, एका अनामिक भीतीच्या छायेत वावरत होतो. भीती तरी कसली तर पॉझिटिव्ह या शब्दाची, हो 'बी पॉझिटिव्ह' हा वाक्प्रचार आता जुना झालाय. सध्या आपण सगळेच 'निगेटिव्ह' कसं राहता येईल या विचारात आणि कृतीत अडकलो असताना सगळेच्या सगळे एकदम पॉझिटिव्ह ! या पॉझिटिव्ह आणि नकोश्या पाहुण्याने आपले खरे रंग दाखवायला सुरुवात केली. आम्हाला 'निगेटिविटी' च्या खाईत लोटून हा चक्क आमच्या शरीरात ठाण मांडून बसला ना ! आम्हाला त्याच्या येण्याची कुणकुण लागली मात्र आम्ही लगेचच औषध घेऊन त्याला प्रतिबंध करायची तयारी सुरू केलीच होती. ऑक्सिमीटर देखील आणला होताच त्यात प्राणवायू मोजायला लागलो. 'कोरोना'ने आमच्यातला एका सदस्याच्या शरीरात छुपा संचार करायला सुरुवात केली. त्याला वाटलं आम्हाला कळणार नाही पण ऑक्सिमीटरने त्याचे हे कारनामे आम्हाला दाखवून दिले. आम्हाला आता या छुप्या कोरोनाची नाकाबंदी करायला त्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागलं. तिथे त्याला जेरबंद करायला सेना तयार होतीच. हॉस्पिटलमधले डॉक्टर्स व नर्सेसची सेना अहोरात्र, जराही न थकता आमच्या एका सदस्याला बरं करण्याच्या कामात गुंतली होती. आम्ही उरलेल्या चौघांनी मात्र घरीच राहून याचा सामना करायचा ठरवलं. आमच्या १४ दिवसांच्या वनवासाची मोहोर पुणे महानगरपालिकेने दारावर उमटवली आणि आम्ही होम क्वारंटाईन झालो.

रोज औषधं, प्रतिकार शक्ती वाढवणारी अनेक गोळ्यांची मात्रा, कोरोनाचा आमच्यावर झालेला हल्ला परतवून लावण्यासाठी, त्याला घशातच कोंडून मारण्यासाठी आम्ही दिवसातून २-३ वेळा गरम पाण्याची वाफ, काढे, गरम दूध हळद अशी सगळी ठेवणीतली शस्त्रास्त्रे बाहेर काढली. जसजसे दिवस पुढे जाऊ लागले तसे त्याला जाणवले की इथे काही आपली खैर नाही, हे लोक काही आपल्याला थारा देणारे नाहीत. आम्ही सुरू केलेल्या उपचाराने त्याला हे कळून चुकलं होतं की लवकरच या नव्या घरातून आपली हकालपट्टी होणार आहे. तरीही तो आपला हट्ट सोडत नव्हताच. त्याने गनिमी काव्याने आमच्यावर हल्ला केलेला असल्याने आम्हाला त्याचे वार झेलावे लागलेच. अधूनमधून सर्दी खोकल्याचे झटके येतच होते, अंग तापलं होतं. आमची तहान-भूक हरपली, अन्नावरची वासना उडाली. प्रचंड अशक्तपणा आला. कोरोनाने आमच्यात एक निराशा - निगेटिव्हिटी पेरून आम्हाला हरवायची एक संधी सोडली नाही. पहिले २-४ दिवस 'तो' आलाय, आपल्यात शिरलाय हा धक्का पचवून, त्या निराशेच्या गर्तेत गोल गोल फिरताना आम्हाला काही म्हणजे काही सुचू दिलं नाही. पण त्या परिस्थितीमध्ये 'श्रीराम जन्मभूमी'पूजनाच्या निमित्ताने घरात लावलेल्या 'गीतरामायणाच्या' गाण्यांनी 'कोरोना'ला दणका दिला. 'आता पॉझिटिव्ह झालोच आहोत तर अजून पॉझिटिव्ह राहू आणि हा हल्ला परतवून लावू' अशा निश्चयाने एकमेकांना मोटिव्हेट करत आम्ही सगळे त्याच्या विरोधात घट्ट पाय रोवून उभे राहिलो. थोडं थोडं जेवू, जमेल तेवढा आराम करू, औषधपाणी वेळेवर घेऊ आणि लवकर बरे होऊ हा निश्चय मनाशी करून थोडे सजगपणे आणि निग्रहाने काळजी घेऊ लागलो. इकडे आमच्या सोसायटीमधल्या सगळ्या शेजाऱ्यांनी, नातेवाईकांनी आणि मित्र मंडळींनी खूप मोलाचं सहकार्य करून आम्हाला नाष्टा, जेवण पुरवण्याची, अगदी दारापर्यंत पोचवण्याची सगळी व्यवस्था केली. अनेकांनी फोन, मेसेजवरून आमच्याशी सतत संपर्कात राहून आमचं मनोबल वाढवायचं महत्त्वाचं काम केलं. आम्हाला जे लागेल ते पुरविण्यासाठी स्वतः योग्य ती काळजी घेऊन न घाबरता आमच्या अगदी घरापाशी येऊन मदत केली आणि आमचे एकांतवासाचे हे १४ दिवस सुकर केले. एकीकडे रोज ३-४ वेळा पुणे महानगरपालिका, पोलीस कमिशनरच्या ऑफिसमधून फोन यायचे आणि आमच्या सगळ्या सदस्यांच्या तब्येतीची विचारपूस, नोंदणी, दखल घेतली जात होती. काही वॉलेंटियर्स डॉक्टर्स टीम मधल्या डॉक्टरने पण फोन वरून आमच्या लक्षणांची विचारपूस करून आम्हाला योग्य ती खबरदारी घ्यावयास सांगितले. माझी सख्खी चुलत बहीण आणि तिचे मिस्टर हे आमचे घरातले डॉक्टर आमची फोनवरून रोज चौकशी करून योग्य औषधे, उपचार घेण्याच्या सूचना देत होते. फोनवर आम्हाला मार्गदर्शन करणारे डॉक्टर तुषार आणि दिनानाथ हॉस्पिटलचे डॉक्टर पवार यांनी आम्हाला इतकं सहकार्य केलं की आमचा ॲडमिट असलेला सदस्य योग्य, सुरक्षित हातात आहे आणि उपचाराने बरा होतोय हे घरबसल्या सुद्धा कळू शकलं. आमच्या काही मित्रांनी हॉस्पिटलमधल्या ओळखीच्या स्टाफच्या मदतीने आमचा तिथल्या सपोर्ट सिस्टीम, ॲडमिनिस्ट्रेशन टीम सोबत, आमच्या सदस्याबरोबर संवाद घडवून आणला.

आता इतकी सगळीकडून काळजी घेतली जातेय म्हटल्यावर आणि आमच्या तीव्र इच्छाशक्तीसोबत आमच्या सगळ्या 'सुहृदांच्या शुभेच्छा आणि प्रार्थना' यांची ताकद इतकी जबरदस्त होती की 'कोरोना'ला आमचं घर आता परकं वाटू लागलं आणि त्याने लवकरच आमच्या घरातून जाण्यासाठी परतीचं तिकिट काढलं. त्याला कळून चुकलं की इथे आता आपला अधिक निभाव लागायचा नाही तेव्हा इथून काढता पाय घेतलेला बरा ! फायनली आता त्याला निरोप देऊन पुन्हा इकडे न फिरकण्याचं आवाहन करून आम्ही त्याची बोळवण केली आहे.

मंडळी, हा अनुभव अशा शब्दांत तुमच्याशी शेअर करताना मनात मात्र अशा असंख्य उदाहरणांची जाणीव आहे की 'कोरोना'ने अनेक (पान १६ वर)

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

आयुष्य, अनेकांचे संसार, अनेकांची घरे उद्ध्वस्त केली आहेत. 'कोरोना'हा पाहुणा कुठेतरी उग्र रूप धारण करून वाताहत करतोय तर कुठे छोटीशी झलक दाखवून अनेकांच्या तब्येती आणि मनःस्वास्थ्य बिघडवतोय. गेले ४-५ महिने त्याने माणसाला अक्षरशः वेठीला धरलंय आणि आपल्या तालावर नाचवतोय. हे सगळंच कुठेतरी आता असह्य होत चाललंय.

बाकी यातून लोकांचा धंदा कसा होतोय, बाजार कसा मांडलाय हा विषयाला हात घालायचा नाहीये. कारण एकूणच फेसबुक, व्हॉटस्अप युनिव्हर्सिटीने खूप ग्यान दिलंय आणि एवढं ज्ञान घेऊन सुद्धा, काळजी घेऊन सुद्धा कोरोना अनेकांना गाठतोय. पण शेवटी याला किती गांभीर्याने घ्यायचं, कधी घ्यायचं, त्याला न घाबरता त्यातून लवकर बरं कसं व्हायचं, योग्य आणि वेळीच उपचार का आणि कसे घ्यायचे आणि सकारात्मक राहून यातून बाहेर कसं पडायचं याचा एक 'मोठ्ठा धडा' या निमित्ताने आम्ही सगळ्यांनी गिरवला आणि या संकटातून स्वामी कृपेने सहीसलामत बाहेर पडलो. 'आलेलं प्रत्येक संकट आपल्याला काहीतरी शिकवून जातं' या उक्तीप्रमाणे संयम, चिकाटी, धैर्य, सकारात्मकता, वाईटात चांगलं शोधता येण्याची दृष्टी, अशा वेळी उपयोगाला येणारी आपली चांगली कर्म, आपल्याला वेळोवेळी भेटणारी देवमाणसे, त्यांच्या चांगुलपणावरचा आणि सिस्टीमवरचा विश्वास, आपला खंबीरपणा आणि आत्मविश्वास अशा अनेक गोष्टींची जाणीव, उपरती आमच्या अनुभवाच्या खात्यात टाकून हा आजार आम्हाला खूप काही शिकवून गेला. लवकरच या साथीवर, महामारीवर योग्य ती उपाय योजना, लस मिळो आणि या माणसाच्या सध्याच्या 'एकमेव शत्रू'ला लवकरात लवकर नामोहरम करता येवो ही त्या परमेश्वराकडे प्रार्थना !

– सौ. (अनघा) नेहा सातर्डेकर, पुणे. मो. 9004078433

पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०

साप्ताहिक प्राजक्त

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS